रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक २१४
www.ramprahar.com

बुधवार, १९ फेब्रुवारी २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## छत्रपती संभाजी महाराजांबद्दल आक्षेपार्ह लिखाण; कारवाईचे आदेश

**मुंबई :** अभिनेता विकी कौशलची प्रमुख भूमिका असलेला आणि दिग्दर्शक लक्ष्मण उतेकर यांचा छावा चित्रपट सध्या बॉलीवूड विश्वात धुमाकूळ घालत आहे. छत्रपती संभाजी महाराजांच्या शौर्य अन् बलिदानाची कथा या सिनेमाच्या माध्यमातून ७० मिमी पडद्यावर साकारण्यात आली असून प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद या सिनेमाला मिळत आहे, मात्र शिवजयंतीच्या एक दिवस आधी इंटरनेट विकिपीडियावर छत्रपती संभाजी महाराजांबद्दल आक्षेपार्ह लिखाण असल्याचे निदर्शनास आल्यानंतर शिवभक्तांनी संताप व्यक्त केला आहे. याची गंभीर दखल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली असून छत्रपती संभाजी महाराज हे आमचे आदर्श आहेत. त्यांच्यासंदर्भात असले लेखन खपवून घेणार नाही. याबाबत सायबरच्या आयजींना विकिपीडियाशी संपर्क करत कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत, असे स्पष्ट केले आहे.

अंतरंग

सिडको गृहनिर्माण योजनेची आज सोडत/२

जाणता राजा छत्रपती शिवाजी महाराज (लेख)/४

आदिवासी रायगड प्रीमियर लीगला उत्स्फूर्त प्रतिसाद/८

# पनवेल मनपा क्षेत्रातील प्रदूषण नियंत्रणासाठी बैठक

## ■ आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत उपाययोजनांवर भर



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका क्षेत्रातील वाढत्या वायू आणि जल प्रदूषणावर नियंत्रण आणण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळाच्या बेलापूर (नवी मुंबई) येथील विभागीय कार्यालयात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत सोमवारी (दि. १७) महत्त्वपूर्ण बैठक झाली. या बैठकीत नागरिक व विविध संस्थांच्या प्रतिनिधींनी प्रदूषणाच्या समस्या मांडत ठोस कारवाईची मागणी केली.

बैठकीस प्रदूषण नियंत्रण महामंडळाकडून विभागीय अधिकारी श्री. पडवळ आणि श्री. भोसले उपस्थित होते. या वेळी वाढत्या प्रदूषणाच्या पार्श्वभूमीवर १५ कंपन्या थेट सील करण्याचा निर्णय घेण्यात आला. २०० कंपन्यांना नोटीस बजावण्यात आल्या आहेत तसेच रात्री ८ ते सकाळी ६दरम्यान फिशिंग कंपन्यांवर बंदी घालण्याची मागणी महामंडळाने मान्य केली. याशिवाय प्रदूषण नियमांचे उल्लंघन करणाऱ्या बिल्डर्सवर कारवाई करीत प्रदूषण रोखण्यासाठी कामबंदीची नोटीस देण्याची मागणी करण्यात आली.

या बैठकीत भाजप उत्तर रायगड सचिव कीर्ती नवघरे, युवा नेते अमर उपाध्याय, हॅप्पी सिंग यांच्यासह नागरिक व विविध संस्थांचे प्रतिनिधींनी उपस्थित होते. या वेळी प्रदूषण नियंत्रणासाठी लागू असलेल्या नियमांमध्ये बदल करण्याची आवश्यकता असल्याचे महामंडळाकडून अधोरेखित करण्यात आले.

## गुजरात पालिका निवडणुकांमध्ये भाजपचा झंझावात

**अहमदाबाद : वृत्तसंस्था**


गुजरातमध्ये झालेल्या पालिका निवडणुकांमध्ये भाजपने निर्विवाद वर्चस्व राखले आहे. ६८पैकी ६० पालिकांमध्ये भाजपने स्पष्ट बहुमत मिळवले आहे.

काँग्रेसला केवळ एका पालिकेत विजय मिळाला आहे. आम आदमी पक्षाला एकाही पालिकेत विजय मिळालेला नाही, तर समाजवादी पार्टीने दोन पालिकांमध्ये विजय मिळवला आहे. तीन पालिकांमध्ये टाय झाली आहे, तर एका पालिकेत अपक्षांनी वर्चस्व राखले असून एका पालिकेमध्ये कुणालाही बहुमत मिळालेले नाही.

## राज्यात ड्रग्जविरोधी टास्क फोर्सला मंजुरी

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यात अमली पदार्थविरोधी टास्क फोर्स स्थापन करण्यास तसेच त्याकरिताच्या ३४६ पदांना व खर्चास मंगळवारी (दि. १८) झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.



राज्यात अमली पदार्थविरोधी टास्क फोर्स स्थापन करण्यासाठी ३१ ऑगस्ट २०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार मंजुरी देण्यात आली आहे. या फोर्ससाठी आवश्यक असणाऱ्या ३४६ पदांच्या मनुष्यबळाचा प्रस्तावासही मंजुरी दिली गेली. यापैकी ३१० पदे नियमित असतील, तर ३६ पदे बाह्य यंत्रणेकडून भरली जाणार आहेत. यासाठी येणारा आवर्ती खर्च १९ कोटी २४ लाख १८ हजार ३८० रुपये, तर वाहन खरेदीसह अनावर्ती खर्च तीन कोटी १२ लाख ९८ हजार रुपये अदा करण्यासदेखील मान्यता देण्यात आली.

नियमितपणे भरावयाची पदे : विशेष पोलीस महानिरीक्षक एक, पोलीस उपमहानिरीक्षक एक, पोलीस अधीक्षक तीन, अपर पोलीस अधीक्षक तीन, पोलीस अधीक्षक १०, पोलीस निरीक्षक १५, सहाय्यक पोलीस निरीक्षक १५, पोलीस उपनिरीक्षक २०, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक ३५, पोलीस हवालदार ४८, पोलीस शिपाई ८३, चालक पोलीस हवालदार १८, चालक पोलीस शिपाई ३२, कार्यालय अधीक्षक एक, प्रमुख लिपीक दोन, वरिष्ठ श्रेणी लिपीक ११, कनिष्ठ श्रेणी लिपीक सात, उच्च श्रेणी लघुलेखक दोन, निम्न श्रेणी लघुलेखक तीन.

बाह्य यंत्रणेद्वारे भरावयाची पदे : वैज्ञानिक सहाय्यक तीन, विधी अधिकारी तीन, कार्यालयीन शिपाई १८, सफाईगार १२ एकूण ३६.




## निवडक

### ज्ञानेश कुमार देशाचे नवे मुख्य निवडणूक आयुक्त

**नवी दिल्ली :** ज्येष्ठ सनदी अधिकारी



ज्ञानेश कुमार यांची केंद्रीय निवडणूक आयोगाच्या मुख्य निवडणूक आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे. सध्याचे मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांच्याकडून ते १९ फेब्रुवारी रोजी पदभार स्वीकारतील. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील तीन सदस्यांच्या निवड समितीने देशाचे २६वे मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून ज्ञानेश कुमार यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले. त्यांचा कार्यकाळ २६ जानेवारी २०२९पर्यंत असणार आहे.

### दिल्लीतील नव्या मुख्यमंत्र्यांच्या शपथविधी समारंभ वेळेत बदल

**नवी दिल्ली :** नुकत्याच झालेल्या दिल्ली विधानसभा निवडणुकीत भाजपने मोठा विजय मिळवला. यानंतर नवीन मुख्यमंत्र्यांचा शपथविधी समारंभ २० फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता रामलीला मैदानावर होणार आहे. याआधी हा समारंभ संध्याकाळी ४.३० वाजता होणार असे म्हटले होते, मात्र आता वेळेत बदल करण्यात आला आहे. शपथविधी सोहळा भव्य करण्यासाठी तयारी सुरू आहे.

## शिवजयंतीनिमित्त आज उलवे नोडमध्ये महाराष्ट्राची महासंस्कृती शानदार कार्यक्रम

**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त बुधवारी (दि. १९) उलवे नोडमधील रामशेठ ठाकूर मैदानावर राज्यातील लोकसंस्कृतीवर आधारित मराठमोळा कलाविष्कार असलेला महाराष्ट्राची महासंस्कृती या दर्जेदार कार्यक्रम होणार आहे. छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळा उभारणी व सुशोभीकरण समितीच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.




उलवे नोड सेक्टर १२मधील प्लॉट क्रमांक ६ येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलजवळील रामशेठ ठाकूर मैदानावर सायंकाळी ६ वाजता होणाऱ्या या कार्यक्रमाला छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळा उभारणी व सुशोभीकरण समितीचे अध्यक्ष लोकनेते रामशेठ ठाकूर, उपाध्यक्ष जे.एम. म्हात्रे, पनवेल विधानसभा आमदार प्रशांत ठाकूर, उरण विधानसभा आमदार महेश बालदी, विधान परिषद आमदार विक्रांत पाटील, कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील, समितीचे उपाध्यक्ष व भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, समितीचे सरचिटणीस व काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांच्यासह अनेक मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

महाराष्ट्राची महासंस्कृती या कार्यक्रमात राज्यातील लोककला, लोकसंगीत, गण गवळणी, लावणी, अभंग, पोवाडा, बहुरंगी संगीत आणि नृत्यरचनांचा समावेश असून विशेषतः शिवराज्याभिषेक सोहळा सादर होणार आहे. या कार्यक्रमाचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळा उभारणी व सुशोभीकरण समितीकडून करण्यात आले आहे.




## यूट्यूबर रणवीर अलाहबादियावर कोर्टाकडून निर्बंध

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

इंडियाज गॉट लॅटेंट प्रकरणामध्ये यूट्यूबर रणवीर अलाहबादियाच्या अटकेला सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती देण्याचा निर्णय घेतला, मात्र अलाहबादियाला परवानगीशिवाय देश सोडून जाण्यास तसेच शो करण्यास मनाई करण्यात आली आहे.

वादग्रस्त वक्तव्याबद्दल महाराष्ट्र, आसाम आणि राजस्थानमध्ये अलाहबादियाच्याविरोधात विविध एफआयआर दाखल झाले आहेत. या प्रकरणाच्या सुनावणीवेळी न्यायालयाने यूट्यूबरला फटकारले तसेच यूट्यूबवरील अश्लील सामग्री नियंत्रित करण्याचा विचार करावा, अशी सूचना शासनाला केल्या. अलाहबादियाने विविध एफआयआर एकत्रित करण्यासाठी आणि अटकेपासून अंतरिम संरक्षण मागण्यासाठी न्यायालयात धाव घेतल्यानंतर न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती एन. कोटीश्वर सिंह यांनी ते मान्य केले, मात्र ठाणे पोलिसांकडे त्याचा पासपोर्ट जमा करण्याचे आदेश दिले.



# नगर परिषदांच्या विकासासाठी नक्षा पथदर्शी प्रकल्प महत्त्वपूर्ण -जिल्हाधिकारी

**खालापूर : प्रतिनिधी**

नगर परिषद हद्दीतील सर्व नागरिकांना स्वतःच्या मालकीची सनद मिळण्यासह नगर परिषदेच्या विकास आराखड्यासाठी नक्षा पथदर्शी प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा ठरणार असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले.

केंद्र सरकारच्या ग्रामीण विकास मंत्रालयाच्या भूमी संसाधन विभागामार्फत सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमाचा शुभारंभ मध्य प्रदेशमध्ये झाला असून देशभरातील १५२ नगर परिषदांची यात निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्रातील आठ नगर परिषदांचा यात समावेश असून, कोकण विभागातून खोपोली आणि कुळगाव-बदलापूर नगर परिषदांची निवड करण्यात आली आहे. या पथदर्शी उपक्रमाचे उद्घाटन जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या



हस्ते खोपोली नगर परिषद सभागृहात आयोजित कार्यक्रमात करण्यात आले.

या वेळी जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख सुनील इंदलकर, उपविभागीय अधिकारी प्रकाश संकपाळ, तहसीलदार अभय चव्हाण, उप अधिक्षक भूमी अभिलेख, खालापूर, प्रमोद जरग,नगर परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी, डॉ. पंकज पाटील, समाधान पाटील उपस्थित होते.

जिल्हाधिकारी किशन जावळे म्हणाले की, या प्रकल्पामुळे प्रत्येक नागरिकाला मालकीच्या भूखंडाची अधिकृत सनद मिळणार आहे, जी बँक कर्जासाठी, मोर्गेज तसेच इतर आर्थिक व्यवहारांसाठी उपयुक्त ठरणार आहे तसेच या उपक्रमामुळे अतिक्रमण रोखणे शक्य होईल आणि नगर परिषदांच्या विकास आराखड्याच्या तयारीस मदत होईल. या संपूर्ण मोहिमेसाठी सर्व्हे ऑफ इंडिया आणि नागरी स्वराज्य संस्था यांच्या सहाय्याने नगर भूमापन व भू-संदर्भीकरण केले जाणार आहे. यामुळे आपत्ती व्यवस्थापन अधिक प्रभावी होणार असून, नियोजनबद्ध शहरी विकास साधता येणार आहे.

हा प्रकल्प यशस्वी रित्या राबविला गेला, तर नगर परिषद हद्दीतील शहरीकरण नियोजनबद्ध होईल आणि नागरिकांना त्यांच्या मालमत्तेवर अधिकृत हक्क मिळेल, असा विश्वास जिल्हाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमास खोपोली नगर परिषदेचे माजी नगरसेवक, नगर परिषद हद्दीतील नागरिक, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

# उपमुख्यमंत्री शिंदेंच्या हस्ते सिडको गृहनिर्माण योजनेची आज सोडत

**नवी मुंबई : सिडको वृत्तसेवा**

छत्रपती शिवाजी महाराज जयंती दिनी सिडको महामंडळातर्फे महाराष्ट्रातील आतापर्यंतची सगळ्यात मोठी, २१,३९९ घरांची माझे पसंतीचे सिडकोचे घर या गृहनिर्माण योजनेची संगणकीय महासोडत बुधवारी (दि.१९) दुपारी १ वाजता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते होणार आहे.



संगणकीय महासोडत यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई येथे आयोजित करण्यात आली आहे. प्रत्यक्ष कार्यक्रमस्थळासोबतच सोडतीचे थेट प्रक्षेपण वेबकास्टींगच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. यामुळे अर्जदार आपल्या सोयीच्या ठिकाणाहून या सोडतीचे साक्षीदार होऊ शकतात.

या योजनेंतर्गत नवी मुंबईतील वाशी, बामणडोंगरी, खारकोपर, खारघर, खारघर पूर्व (तळोजा), मानसरोवर, खांदेश्वर, पनवेल व कळंबोली नोडमध्ये प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक आणि अल्प उत्पन्न गटाकरिता सदनिका उपलब्ध करून देण्यात येत आहेत. अर्जदारांना त्यांच्या पसंतीची सदनिका निवडण्याचे स्वातंत्र्य हे या योजनेचे वैशिष्ट्य आहे. या योजनेद्वारे २१,३९९ कुटुंबांचे हक्काच्या घराचे स्वप्न साकार होणार आहे.

सोडत प्रक्रियेचे थेट प्रक्षेपण https://cidcohomes.com या संकेतस्थळावर करण्यात येणार आहे. अर्जदार सदर संकेतस्थळावर, त्यांच्या सिडको होम खात्यात लॉग इन करून सोडतीचा निकाल घरबसल्यादेखील पाहू शकतात.

याशिवाय सोडतीचे थेट प्रक्षेपण खारघर पूर्व (तळोजा): भूखंड क्र.१४, सेक्टर ३७, तळोजा पाचनंद, पनवेल, खांदेश्वर: भूखंड १, से. २८, खांदेश्वर रेल्वे स्टेशन, कामोठे, पनवेल, खारघर : भूखंड ६३ अ, से. १५, खारघर, पनवेल येथील अनुभव केंद्रांवरदेखील करण्यात येणार आहे.

# उसर येथे डम्परच्या धडकेने दुचाकीस्वार ठार

**रेवदंडा : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील अलिबाग-रोहा मार्गावर उसर येथील पेट्रोल पंपासमोर डंपरच्या धडकेने २१ वर्षीय युवा मोटरसायकलस्वार ठार झाल्याची घटना घडली आहे.



रविवार (दि. १६) सकाळी माळी भेरसे येथील २१ वर्षीय आयुष अनिल म्हात्रे एटीएम मधून पैसे काढण्याकरीता उसर येथे हिरो होंडा मोटरसायकलने गेला होता. एटीएम मधून पैसे काढून घरी येतांना मौजे उसर गावचे हद्दीत I एचपी पेट्रोल पंपा कडे जात असताना, पाठीमागून येणार्या ड्ंपर वरील चालक हरिश्चंद्र धसाडे यांनी भरधाव वेगात मोटर सायकलला पाठीमागून धडक दिली.


जखमी मोटरसायकलस्वार आयुष म्हात्रे यांस ताबडतोब रूग्णालयात दाखल करण्यात आले, परंतू या अपघातात दुर्दैवाने त्याचा मृत्यु झाला. या अपघाता नंतर डंपर चालक अपघाताची खबर न देता घटनास्थळावरून पळून गेला. अशी तक्रार रिक्षा चालक प्रदिप म्हात्रे यांनी रेवदंडा पोलिस ठाणे येथे दिली आहे. दरम्यान सोमवारी सायकांळी फरार झालेल्या डंपर चालकास पोलिसांनी ताब्यात घेवून अटक केली.अधिक तपास रेवदंडा पोलिस ठाण्याचे पोसई शिवकुमार नंदगावे हे करीत आहेत.

# मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेला राष्ट्रीय सुवर्ण पुरस्कार

**मुंबई : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांना कृषी पंपांसाठी दिवसा वीजपुरवठा व्हावा म्हणून सुरू केलेल्या मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० या योजनेला ऊर्जा क्षेत्रातील सर्वोत्कृष्ट कामगिरीसाठी प्रतिष्ठेचा स्कोच सुवर्ण राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्याचसोबत महावितरणच्या सौर ग्राम योजनेला स्कोच रौप्य पुरस्कार मिळाला.

महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी शनिवारी नवी दिल्ली येथे हे पुरस्कार स्वीकारले. स्कोच समुहातर्फे दरवर्षी सार्वजनिक क्षेत्रात उपयुक्त ठरलेल्या विविध योजनांसाठी पुरस्कार



देण्यात येतात. विविध तज्ज्ञांकडून अत्यंत काटेकोरपणे परीक्षण होऊन ज्युरींच्या मतांच्या आधारे हे पुरस्कार दिले जातात.

अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांच्या संयोजनात राज्याचा ऊर्जा विभाग, महावितरण आणि महसूल विभागातर्फे समन्वयाने मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० यशस्वीरित्या राबविण्यात येत आहे. या योजनेत विकेंद्रित स्वरुपात सौर ऊर्जा निर्मिती करून त्यावर कृषी पंप चालविण्यात येतात. मा. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते एप्रिल २०२३ मध्ये ही योजना सुरू झाल्यानंतर गतीने अंमलबजावणी सुरू आहे. आतापर्यंत ४९ प्रकल्प पूर्ण झाले असून त्यांची क्षमता २०३ मेगावॅट आहे. मार्च २०२६ पर्यंत ही योजना पूर्ण होईल व राज्यातील सर्व कृषी पंप सौर ऊर्जेवर चालविण्याचे स्वप्न पूर्ण होईल. त्यामुळे सौर कृषी पंपांसाठी १६ हजार मेगावॅट सौर ऊर्जानिर्मिती क्षमता निर्माण होणार आहे.

# गोमांस विक्रीप्रकरणी रोह्यात एकाला अटक

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील अष्टमी येथील वरचा मोहल्ला येथे सोमवारी (दि.१७) अज्ञातांकडून गोवंशाची कत्तल करून मांस सज्ञत इब्राहिम बेडेकर मुळ राहणार बंगाल यांच्या भाडेकरु जमाल जामीमुद्दीन मिहार यांनी खाण्याकरिता आणले असल्याची माहिती रोहा पोलिसांना मिळाली. त्यांनी रात्री उशिरा धाड टाकुन गोवंशीय जनावरांची कत्तल व मांस जवळ बाळगल्याप्रकरणी तिघांविरुद्ध रोहा पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल केला आहे.

आरोपी जमाल जालीमुद्दीन मिहार व गोमांस विक्री करणारा अज्ञात व्यक्ती व तिसरा आरोपी गोमास करणारा अज्ञात व्यक्ती अशा तीन आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला. आरोपी जमाल याला अटक केलेले असून उर्वरित आरोपी फरार आहेत. घटनेचा पुढील तपास रोहा पोलीस स्टेशनचे अधिकारी करीत आहेत .

उपविभागीय पोलिस अधिकारी रवींद्र दौंडकर यांनी आरोपीने भारतीय नागरिक कायद्यानुसार आधार कार्ड, पॅन कार्ड सादर करावे पोलीस व्हेरिफाय करून चेक करतील घुसखोर बांगलादेशी असल्यास त्याच्यावर कठोर कारवाई करण्यात येईल, अशी माहिती दिली.

# भारत विकास परिषदेचा ऊर्जिता पुरस्कार वितरण सोहळा उत्साहात

**पनवेल : प्रतिनिधी**

भारत विकास परिषदेच्या पनवेल शाखेच्या वतीने 'ऊर्जिता पुरस्कार' वितरण सोहळा झाला. राष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने या सोहळ्याचे आयोजन खांदा कॉलनीतील सीकेटी महाविद्यालयात करण्यात आले.

प्रमुख पाहुणे म्हणून कीर्तन, प्रवचन, व्याख्यान या माध्यमातून आयुर्वेद व आरोग्य याचा प्रसार करणाऱ्या तसेच समुपदेशन विषयाच्या अभ्यासक डॉ.गौरी पुणतांबेकर आणि वर्षा प्रशांत ठाकूर यांच्यासह विविध संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.

पनवेल शाखेचे पुरस्कार वितरणाचे हे तिसरे वर्ष असून यंदा पनवेलमधील डॉ.संगिता जोशी, ॲड.सुजाता चव्हाण, सुजाता खरे, शैला खाडे व ॲड.शुभांगी झेमसे यांना 'उर्जिता पुरस्कार'



प्रदान करण्यात आला.

डॉ. गौरी पुणतांबेकर यांनी आपल्या भाषणात 'पुण्यश्लोक आहिल्याबाई होळकर' यांच्या चरित्र गाथेवर प्रकाश टाकला. कार्यक्रमात प्रारंभी PPT द्वारा भारत विकास परिषदच्या कार्याचा आढावा डॉ. शिल्पा गोडबोले यांनी घेतला. पनवेलच्या अध्यक्ष डॉ. कीर्ती समुद्र यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. पुरस्काराच्या मानपत्राचे वाचन डॉ. समिधा गांधी व शुभांगी भिडे यांनी केले. ज्योती कानिटकर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

**पनवेल शहर परिसरात समाजप्रिय सातत्यपूर्ण उल्लेखनीय, काम करणार्या परंतु कौतुक, प्रसिद्धी, पुरस्कार यापासून दूर असलेल्या महिलांचा शोध घेऊन भारत विकास परिषद पनवेल संस्थेच्या वतीने 'उर्जिता पुरस्कार' देऊन त्या सन्मानिय महिला व त्यांच्या कार्याचा विशेष गौरव केला जातो.**
**-पद्मजा कुलकर्णी, सचिव, भारत विकास परिषद पनवेल**

# परदेशी शिक्षणाच्या शिष्यवृत्तीसाठी अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना आवाहन

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

अल्पसंख्यांक विकास विभागांतर्गत अल्पसंख्यांक समुदायातील विद्यार्थ्यांनी परदेशामध्ये उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती निवडीसाठी सन २०२४-२५ करिता पात्र विद्यार्थ्यांनी परिपूर्ण आवश्यक त्या कागदपत्रांसह अर्ज सादर करावेत, असे आवाहन सहाय्यक आयुक्त समाजकल्याण, रायगड सुनील जाधव यांनी केले आहे.

पीएचडीसाठी ४ वर्षे किंवा प्रत्यक्ष अभ्यासक्रमाचा कालावधी यापेक्षा कमी असेल तो तथापि कोणत्याही परिस्थितीत दोन वर्षापेक्षा कमी नसावा. परदेशी शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत दोन वर्ष कालावधीचाच अभ्यासक्रम अनुज्ञेय राहील. शिष्यवृत्ती द्यावयाच्या एकूण जागेपैकी ३० टक्के जागांवर मुलींची गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल. जर त्याप्रमाणात मुलींचे प्रवेश अर्ज प्राप्त न झाल्यास त्या जागेवर मुलांची गुणवत्तेनुसार निवड करण्याचे अधिकार निवड समितीला राहतील.

एकाच कुटूंबातील जास्तीत जास्त दोन मुलांना परदेश शिष्यवृत्तीचा लाभ देता येईल त्यापेक्षा जास्त मुलांना परदेश शिष्यवृत्ती लागू राहणार नाही. पदव्युत्तर पदवी किंवा पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमासाठी पदवी परिक्षेत व पीएचडी साठी पदव्युत्तर परीक्षेत किमान ५५ टक्के गुण असणे आवश्यक आहे. ही पदवी किंवा पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम त्याने अर्जाच्या दिनांकाला उतीर्ण केलेला असावा.तसेच अधिक माहितीसाठी शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर विस्तृत जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

# जासई विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा

**उरण : बातमीदार**

रयत शिक्षण संस्थेच्या जासई येथील श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि.बा. पाटील ज्युनिअर कॉलेजमध्ये इयत्ता दहावीच्या बोर्ड परीक्षेला प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांचा शुभचिंतन सोहळा झाला.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून एसएससी बोर्ड नवी मुंबई, वाशीचे पर्यवेक्षक मनोहर पवार हे खुद्द उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी भयमुक्त व कॉपीमुक्त कसे सामोरे जावे तसेच परीक्षा कालावधीत कोणती प्रमुख खबरदारी घ्यावी, याविषयी योग्य मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढविला. विद्यालयाचे प्राचार्य तथा रायगड विभागाचे विभागीय अधिकारी एम.के कोंगेरे यांनी उपस्थित मान्यवरांचे शाळेच्या वतीने स्वागत करून विद्यार्थ्यांना बोर्ड परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या.



शाळा व्यवस्थापन व विकास समितीचे अध्यक्ष व भारतीय मजदूर महासंघाचे राष्ट्रीय महामंत्री आणि कामगार नेते सुरेश पाटील यांना लोकनेते दि.बा.पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ नामकरण सर्वपक्षीय कृती समिती आणि अखिल आगरी समाज परिषद मार्फत दि.बा. पाटील योद्धा हा सन्मान प्राप्त झाल्याबद्दल शाळेच्या वतीने त्यांचे या कार्यक्रमावेळी स्वागत करून अभिनंदन करण्यात आले.

सुरेश पाटील यांनी आपल्या मनोगतात विद्यार्थ्यांना स्पर्धेच्या युगात यशस्वी होण्यासाठी अभ्यासाचे महत्त्व विषद करून बोर्ड परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या.


या कार्यक्रमाचे अध्यक्ष चेअरमन अरुण जगे हे होते. त्यांनी आणि रयत सेवक संघाचे महाराष्ट्र समन्वयक नूरा शेख यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने दहावी आणि बारावी मधील विद्यार्थ्यांनी शाळेसाठी प्रिंटर भेट दिला. हा कार्यक्रम यशस्वी करण्या मध्ये इयत्ता दहावीच्या वर्गशिक्षिका एस.एम.बाबर, ए.एस.मोकल, एन.एन. हुद्दार, आर.एम.मोकाशी यांनी विशेष मेहनत घेतली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करून आभार पी.जे. घरत यांनी मानले.

## निवडक

### शिवजयंतीनिमित्त विविध कार्यक्रम

**नवी मुंबई :** श्री दत्त सामजिक सेवा संस्था व मेडी कव्हार हॉस्पिटल खारघर यांच्या संयुक्त विद्यमाने शिवजयंती उत्सवाचे औचित्य साधत सानपाडा येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिर व दाखले वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवारी (दि.१९) सानपाडा सेक्टर ६ येथे सामाजिक कार्यकर्त्या शिल्पा ठाकूर यांच्या वतीने शिवजयंती निमित्ताने नागरिकांन साठी मोफत आरोग्य शिबीर तसेच मोफत नेत्र तपासणीसह मोफत चष्मे वाटप करण्यात येणार आहे. तसेच विविध आजाराविषयी तपासण्यादेखील करण्यात येणार आहेत. या शिवाय मोफत दाखले वाटपसुद्धा केले जाणार असल्याचे ठाकूर यांनी सांगितले.



**चौक : शिवजयंती उत्सवासाठी अंगणवाडी, ज्युनिअर, सिनिअर शाळांना सुट्टी असल्याने मंगळवारी शिवजयंती साजरी करण्यात आली. या वेळी बच्चेकंपनीने ऐतिहासिक पेहराव परिधान केला होता.**

# कोकण विभागीय आयुक्तपदी विजय सूर्यवंशी

**मुंबई :** राज्यात वरिष्ठ आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचा धडाका सुरूच असून आताही नऊ आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश जारी करण्यात आले आहेत. त्यामध्ये कोकण विभागीय आयुक्त राजेश देशमुख यांची राज्य उत्पादन शुल्क आयुक्त पदावर बदली करण्यात आली आहे. तसेच त्यांच्याकडे उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या कार्यालय सचिव पदाचा अतिरिक्त कार्यभारही सोपवण्यात आला आहे. तर राज्य उत्पादन शुल्कचे आयुक्त विजय सूर्यवंशी यांची बदली कोकण विभागाचे विभागीय आयुक्तपदी करण्यात आली आहे.

# आज पद्मदुर्ग स्वच्छता अभियान

**मुरूड : प्रतिनिधी**

शिवजयंतीनिमित्ताने बुधवारी (दि.१९) राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश अध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांच्या आदेशान्वेय संपूर्ण राज्यातील गड किल्ले स्वच्छता अभियान राबवण्यात येणार आहे. या अनुषंगाने मुरुडमधील ऐतिहासिक पदमदुर्ग किल्ला स्वछता मोहीम राबवण्यात येणार आहे.

खासदार सुनील तटकरे किल्ल्याच्या दुरुस्तीसाठी व येथे नवीन जेट्टी निर्माण करण्यासाठी जे प्रयत्न केंद्रशासन दरबारी केले आहेत त्याबाबत सविस्तर माहिती गड प्रेमींना देणार आहेत. अभियानासाठी फैरोज घलटे, ॲड. मृणाल खोत, संजय गुंजाळ, शीतल घरत, अजित कासार, नम्रता कासार, हसमुख जैन, अशिका ठाकूर, स्मिता खेडेकर, शाम कोतवाल, दिनेश बापलेकर, विजय पैर, बाबू नागावकर, संतोष कांबळी, इस्माईल सिद्धिक आदी परिश्रम घेत आहेत.

# अलिबागमध्ये शिवजयंतीनिमित्त समुद्रकिनारा स्वच्छता मोहीम

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

जिल्ह्यात १९ फेब्रुवारी रोजी शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात येणार असून त्यानिमित्त शहरात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या मार्गदर्शनाखाली अलिबाग समुद्रकिनाऱ्यावर भव्य स्वच्छता मोहिम राबविण्यात आली.

या मोहिमेत मुख्याधिकारी सचिन बच्छाव, स्वच्छता निरीक्षक, पाणीपुरवठा अभियंता तसेच समन्वयक आर्या जाधव, प्रियांका वाघ यांनी सहभाग घेतला. अलिबाग नगरपालिका शाळेतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत किनाऱ्यावरील स्वच्छतेत योगदान दिले.

यावेळी माझी वसुंधरा मोहीमे अंतर्गत विद्यार्थ्यांना स्वच्छते विषयी शपथ दिली. अलिबाग नगर परिषदेच्या पाचही शाळांमध्ये स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या उपक्रमाच्या माध्यमातून स्वच्छता व पर्यावरण संवर्धनाचा महत्त्वाचा संदेश देण्यात आला.



# रास्त भाव धान्य लाभार्थ्यांना आवाहन

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम २०१३ अंतर्गत राज्यातील अंत्योदय व प्राधान्य गट योजनेतील पात्र लाभार्थ्यांना सार्वजनिक वितरण व्यवस्थेतर्गत रास्त भाव धान्य दुकानातुन धान्य वाटप करण्यात येते. तरी सर्व कार्डधारकांनी दरमहा पंधरा तारखेपर्यंत धान्य उचल करावी. तसेच सर्व रास्त भाव धान्य दुकानदारांनी विहीत वेळेत वाटप, करावे असे आवाहन जिल्हा पुरवठा अधिकारी सर्जेराव सोनवणे यांनी केले आहे.

प्रत्येक महिन्याच्या ७ तारखेला अन्न दिन व पुढील सप्ताहात अन्नसप्ताह साजरा करणे व या पंधरा दिवसात जास्तीत जास्त लाभार्थ्यांना धान्य वाटप करणे अशा शासनाच्या सुचना आहेत. त्यामुळे-कोणत्याही लाभर्थ्यांनी महिन्याच्या शेवटी धान्य उचलायला न जाता या पंधरा दिवसात धान्याची उचल करावी.

रास्त भाव धान्य दुकानदाराने या कालावधीत दुकाने चालु राहतील कोणताही लाभार्थी दुकानातून परत जाणार नाही याची दक्षता घ्यावी. संबंधित कार्ड धारकाने काही समस्या उद्भवल्यास तहसिलदार कार्यालयाशी संपर्क करावा, असे आवाहनही सोनवणे यांनी केले आहे.

# हवा प्रदूषण नियंत्रणाला प्राधान्य

## पनवेलमध्ये १५१ हॉटेल्सना नोटीस

पनवेल : रामप्रहर वृत्त

हवा प्रदूषण नियंत्रणाच्या अनुषंगाने बेकरी, हॉटेल्स, रेस्टॉरंट, ढाबा, खाद्यपदार्थ विक्री केंद्रामध्ये तंदूरसाठी स्वच्छ व पर्यावरणपूरक इंधनाचा वापर अनिवार्य करण्याबाबत पनवेल मनपाने आत्तापर्यंत १५१ आस्थापनांना नोटीसा दिल्याची माहिती उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांनी दिली.

उच्च न्यायालय, मुंबई यांनी एमएमआर विभागात वाढत्या प्रदूषणावर नियंत्रण आणण्यासाठी स्वतः जनहित याचिका दाखल करून प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्याबाबत आदेश दिले आहेत. त्या आदेशानुसार महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनात हवा प्रदूषण संदर्भात प्रतिबंधात्मक उपाय योजना राबविण्यासाठी जोरदार मोहीम सुरू आहे.



(संग्रहित छायाचित्र)

या मोहिमेअंतर्गत पनवेल महापालिका कार्यक्षेत्रातील प्रदूषण निर्माण करणाऱ्या, कोळशाचा वापर करणाऱ्या हॉटेल्स, रेस्टारंट, ढाबा, बेकरी, खाद्यपदार्थ विक्री करणाऱ्या १५१आस्थापनांना महापालिकेने नोटीस पाठवली आहे. हॉटेल व बेकरीमधील भट्ट्यांसाठी यापुढे इलेक्ट्रिक आणि सीएनजीवर चालणाऱ्या शेगड्यांचा वापर करावा लागणार आहे. नोटीसद्वारे संबधितास सूचित करण्यात आले आहे की त्यांनी बेकरी व तंदुरसाठी स्वच्छ व पर्यावरणपुरक इंधन जसे की सीएनजी, एलपीजी किंवा विद्युत असे इंधन पर्याय वापरावेत. इंधन म्हणून कोळसा किंवा लाकडाचा वापर करण्यास सक्त मनाई आहे. धोकादायक वायू उत्सर्जन कमी करण्यासाठी योग्य वायू प्रदूषण नियंत्रण उपकरणे (स्क्रबर, आधुनिक चिमणी) बसविणे आवश्यक आहे. तसेच वायु प्रदूषणाचे उत्सर्जन रोखण्यासाठी तंदूर उपकरणांची नियमित देखभाल व दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

महापालिका हद्दीतील ५११ हॉटेल्स, रेस्टारंट, ढाबा, बेकरी, खाद्यपदार्थ विक्री करणाऱ्या आस्थापनापैकी ३५९ आस्थापना विद्युत व गॅसचा वापर करत आहेत. तर १५१ आस्थापना या कोळसा व लाकूडचा वापर करत आहेत. या आस्थापनांना या नोटीस देण्यात आल्या.

या सर्व उपाय योजनांची अंमलबजावणी केल्याबाबत महापालिकेला तातडीने कळवण्याच्या सूचना संबंधित बेकरी व हॉटेल्सना देण्यात आल्या आहेत.

# फॉरेस्टमधील घरासंदर्भातील मागणीचा विचार करू -वनमंत्री गणेश नाईक





पनवेल : रामप्रहर वृत्त

आमदार प्रशांत ठाकूर यांनी फॉरेस्टमधील घरांसंदर्भातली केलेल्या मागणीचा नक्कीच विचार करून यावर राज्य शासनाने दिलेल्या चौकटीच्या बाहेर न जाता पण ती चौकट मोठी करत ग्रामस्थांना न्याय देणार असल्याचे आश्वासन वनमंत्री गणेश नाईक यांनी दिले. आद्य क्रांतीकारक वासुदेव बळवंत फडके यांच्या पुण्यतिथीनिमित्त शिरढोण येथे सोमवारी (दि.१७) अभिवादन कार्यक्रम झाला. या वेळी ते बोलत होते.

महाराष्ट्र राज्याचे वनमंत्री नामदार गणेश नाईक आणि पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पुण्यतिथी सोहळा शिरढोण येथे करण्यात आला. आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके यांच्या पुण्यतिथीनिमित्त शिरढोण गावात विविध कार्यक्रमांचा आयोजन करण्यात आले होते. दरवर्षीप्रमाणे क्रांतीज्योतीचे आयोजन, भव्य मिरवणूक तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांच आयोजन ही या वेळी करण्यात आला होते. शिरढोण हे निसर्गरम्य, डोंगरदऱ्या आणि कर्नाळा किल्ल्याच्या पायथ्याशी असलेले गाव! क्रांतिवीरांचा इतिहास सांगणार गाव आहे या गावाचा सर्वांगीण विकास करून क्रांतीकारांचा इतिहास जपला पाहिजे, असे मत आमदार प्रशांत ठाकूर यांनी या वेळी व्यक्त केले.

ते पुढे म्हणाले, फॉरेस्ट हद्दीतील घरांसंदर्भातला विषय आणि सिडको महामंडळाच नैना योजने विषय हा ग्रामस्थांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न बनला आहे. नामदार गणेश नाईक साहेब आपण वन खात्याचे मंत्री असल्याने फॉरेस्टमध्ये येणाऱ्या घरासंदर्भात आपण ग्रामस्थांना नक्कीच न्याय मिळवून द्याल अशी आशा व्यक्त करत आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके यांना अभिवादन करत आमदार प्रशांत ठाकूर यांनी भावना व्यक्त केल्या.

या वेळी ना. गणेश नाईक यांनी आपल मत व्यक्त करताना म्हटले की, आमदार प्रशांत ठाकूर यांनी केलेल्या मागणीचा नक्कीच विचार करून ग्रामस्थांना न्याय मिळवून देण्याचे आश्वासन या वेळी दिले.

या पुण्यतिथी सोहळ्याला उद्योजक जे.एम. म्हात्रे, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, पनवेल महापालिकेचे विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, भाजप केळवणे विभाग अध्यक्ष मंगेश वाकडीकर, भाजप नेते प्रितेश मुकादम, शिरढोण ग्रामपंचायत माजी उपसरपंच विजय भोपी, प्रमोद कर्णेकर, गजानन घरत, रेश्मा वाजेकर, ग्रामपंचायत सदस्य पुनम मुकादम, अक्षय पवार, भाजप नेते अनंत भोपी, अलंकार भोपी, अभिजित मुकादम, सुशांत वेदक, राजेंद्र भोपी, मदन खारके, दत्ता मुकादम, एकनाथ मुकादम, कुंदा मेंगडे, क्रांतिवीर प्रेमी निलेश भोपी, मंदार जोग, मयुर टकले, शिरढोण सरपंच वैशाली भोईर, उपसरपंच नेहा महाडिक, ग्रामसेविका रजनी माळी आदी उपस्थित होते.

# रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात शिवजयंती उत्साहात

खारघर : रामप्रहर वृत्त

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघरमधील रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात मंगळवारी (दि.१८) शिवजयंती शिवमय वातावरणात झाली.



शिवजयंतीनिमित्त विद्यालयात विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात शिवगर्जनेने झाली. त्याचबरोबर काही विद्यार्थ्यांनी शिवरायांचे पराक्रमाचे वर्णन करणारे समुहगान सादर केले, ज्यामुळे उपस्थितांमध्ये उत्साह आणि अभिमानाची भावना जागृत झाली. शिवजयंती निमित्ताने शिवकालीन वेशभूषेचे आयोजन करण्यात आले होते. ११ वी विज्ञान व वाणिज्यच्या विद्यार्थ्यांनी मिळून 'प्रताप गडाच्या पायथ्याशी' असा सुंदर पोवाडा सादर केला.

कार्यक्रम प्राचार्या निशा नायर यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला. कार्यक्रमाची सांगता महाराष्ट्र गीताने झाली.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन

खारघर : रामप्रहर वृत्त

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील स्पर्धा परीक्षा समिती व राजीव गांधी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवारी (दि.१८) करिअर मार्गदर्शनपर सत्राचे आयोजन केले होते.

या करिअर मार्गदर्शनसाठी राजीव गांधी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिनेश गभाणे यांनी विद्यालयातील विद्यार्थ्यांना करिअर विषयक मार्गदर्शन केले तसेच भविष्यामध्ये वाणिज्य व विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळ्या क्षेत्रात असणाऱ्या करिअरच्या संधी याविषयी माहिती विद्यार्थ्यांना दिली. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांच्या मार्गदर्शनात हा शैक्षणिक उपक्रम यशस्वीरित्या घेण्यात आला.

या करिअर मार्गदर्शन सत्राचे आयोजन प्रा. आनंद शेलार व प्रा. महेश धायगुडे यांनी केले तसेच स्पर्धा परीक्षा समितीतील इतर सर्व प्राध्यापक विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

# पनवेल महापालिकेतर्फे पर्यावरणसेवा योजना बैठक



पनवेल : रामप्रहर वृत्त

माझी वसुंधरा अभियान ५.० अंतर्गत पर्यावरण संवर्धन व संरक्षण याचे महत्व शालेय, स्तरावर बाल वयात विद्यार्थ्यांमध्ये प्रत्यक्ष कृतीद्वारे बिंबवण्यासाठी माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये, महाविद्यालयामध्ये 'पर्यावरण सेवा योजना' उपक्रम पनवेल महापालिकेच्या वतीने राबविण्यात येत आहे. या अंतर्गत आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली नुकतेच गोखले शाळेमध्ये पर्यावरण सेवा योजना बैठकीचेआयोजन करण्यात आले.

माझी वसुंधरा अभियान ५.० अंतर्गत पर्यावरणाचे महत्व शालेय विद्यार्थ्यांना समजावे यासाठी पर्यावरण सेवा योजना हा उपक्रम उपायुक्त डॉ.वैभव विधाते यांच्या सूचनेनूसार महापालिका कार्यक्षेत्रातील महाविद्यालामध्ये, विद्यालयांमध्ये राबविण्यात येत आहे. या अंतर्गत आकाश, जल, वायू, भूमी, अग्नि या माझी वसुंधरा अभियानातील महत्त्वाच्या घटकांनूसार गोखले शाळेमध्ये बैठकी बरोबरच पोस्टर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी पर्यावरणाशी संबधित विविध विषयावरील पोस्टरर्स विद्यार्थ्यांनी तयार केले होते. या बैठकीसाठी गोखले शाळेचे मुख्याध्यापक नरेश मणिराम पाटील, पर्यावरण सेवा योजनेचे संयोजक गौरी शिंदे यांचे सहकार्य लाभले.

**पोस्टर स्पर्धेतील विजेते विद्यार्थी**

प्रथम क्रमांक : आदित्य शामराव शाहू

द्वितीय क्रमांक : तनुजा रमेश झिबरे

तृतीय क्रमांक : पल्लवी ज्ञानेश्वर पवार

## म्युनिसिपल एम्प्लॉईज युनियनची बैठक यशस्वी

# पनवेल मनपा कामगारांचे बेमुदत उपोषण तूर्त स्थगित!

### आमदार प्रशांत ठाकूर आणि आयुक्त मंगेश चितळे यांच्या पुढाकाराने सकारात्मक निर्णय

पनवेल : रामप्रहर वृत्त

पनवेलचे कार्यसम्राट व लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या यशस्वी मध्यस्थीमुळे आणि महानगरपालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या चर्चेत महापालिका कामगारांच्या मागण्यांवर सकारात्मक तोडगा काढण्यात आला आहे. त्यामुळे १८ फेब्रुवारीपासून म्युनिसिपल एम्प्लॉईज युनियनने पुकारलेले बेमुदत उपोषण तूर्त स्थगित करण्यात आले आहे, अशी माहिती युनियनचे सरचिटणीस अनिल जाधव यांनी दिली.



महापालिकेतील कामगारांच्या संदर्भात युनियनने पालिकेकडे मागण्या सादर केल्या होत्या व त्या अनुषंगाने चर्चेची अपेक्षा व्यक्त केली, परंतु चर्चा न झाल्याने म्युनिसिपल एम्प्लॉईज युनियनचे अध्यक्ष ॲड. सुरेश ठाकूर, कार्याध्यक्ष संतोष पवार, सरचिटणीस अनिल जाधव यांच्या नेतृत्वाखाली कामगारांनी १८ फेबुवारीपासून पनवेल महापालिका कार्यालयासमोर बेमुदत उपोषणाची हाक दिली होती. या संदर्भात महापालिका प्रशासनाच्या वतीने अतिरिक्त आयुक्त कैलास गावडे यांनी १५ फेब्रुवारीला चर्चा केली होती.


दरम्यान, कामगारांच्या हिताच्या दृष्टिकोनातून आमदार प्रशांत ठाकूर यांनी विशेष लक्ष देत आयुक्त मंगेश चितळे यांच्याशी संवाद साधत कामगारांच्या मागण्यांसंदर्भात सकारात्मक कार्यवाहीची सूचना केली होती. त्यानुसार १७ फेब्रुवारीला आयुक्त मंगेश चितळे यांच्या अध्यक्षतेखाली सविस्तर बैठक घेण्यात आली.

या बैठकीत कामगारांच्या प्रश्नांवर चांगल्या प्रकारे चर्चा होऊन चर्चेनंतर कामगार हिताचे निर्णय घेण्यात आले. त्यात प्रामुख्याने पेशन्स योजना, वारस व अनुकंपा प्रकरणे, सेवाज्येष्ठतेप्रमाणे नव्याने एकच यादी प्रसिद्ध करून जेष्ठतेनुसार पदोन्नती, गणवेश वाटप व पावसाळी प्रावरणे वेळेत देणे, कामगार-कर्मचारी व अधिकारी, सेवानिवृत्तीधारक यांना १० लाख रुपयांची कॅशलेश मेडिकल पॉलिसी, ग्रामपंचायतकालिन समावेशन कामगारांना महापालिका स्थापनेच्या दिनांकापासून (१ ऑक्टोबर २०१६) सेवा सुविधा देण्याबाबत सकारात्मक भूमिका घेण्यात आली तसेच कंत्राटी कामगारांना योग्य न्याय मिळवून देण्यात येईल, आश्वासित प्रगती योजना लागू करून फरकासह अंमलबजावणी येत्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीपूर्वी करण्यात येईल असे बैठकीत ठरले.

आयुक्त मंगेश चितळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीस अतिरिक्त आयुक्त कैलास गावडे, भाजपचे जिल्हा सरचिटणीस व माजी नगरसेवक नितीन पाटील, माजी नगरसेवक अजय बहिरा, आस्थापन विभाग प्रमुख दीपक सिलकन, योगेश्वर पाटील; तर संघटनेकडून कार्याध्यक्ष संतोष पवार, सरचिटणीस अनिल जाधव, कोषाध्यक्ष दत्तगुरू म्हात्रे, विभागीय अध्यक्ष शैलेश गायकवाड, ज्येष्ठ प्रतिनिधी अनंता पाटील, विश्राम म्हात्रे, हरेश कांबळे, रामा भोईते, निलेश म्हात्रे, राकेश परदेशी, निलेश जोमा म्हात्रे, विशाल गायकवाड, शांताराम म्हात्रे, कांतिलाल शेळके, प्रवीण भोईर, जीवन भेंडे, आकाश केणी, रवींद्र जाधव, विजय गावडे, रोशन चिमणे, प्रफुल्ल भगत, सचिन पाटील आदी उपस्थित होते.



**पनवेल : विधान परिषद आमदार विक्रांत पाटील यांच्या पाठपुराव्याने ठाणा नाका हायवेवर गार्डन हॉटेल ते नवीन महापालिका कार्यालय या भागात तीन ठिकाणी रंबलर स्ट्रीप टाकण्यात आले.**



पनवेल : अखंड महाराष्ट्राचे आराध्य दैवत श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्ताने शहरातील शिवरायांच्या अश्वारुढ पुतळा व परिसरात विद्युत रोषणाई करण्यात आली आहे.



रसायनी : पाताळगंगा एमआयडीसी परिसरातील लाडिवली गावाशेजारी सन १९६२पासून सुरू असलेल्या लोना इंडस्ट्रीज लिमिटेडमधील सुमारे १५ ते २० वर्षे कंत्राटी पद्धतीने काम करीत असणाऱ्या ५३ कंत्राटी कामगारांनी सोमवारपासून बेमुदत आमरण उपोषण सुरू केले आहे. लोना कंपनीत कायम करण्यासह पगारवाढ व इतर अनुषंगिक मागण्यांसाठी हे उपोषण सुरू असून यामध्ये ज्यांना न्याय मिळाला नाही ते कामगार व महिलावर्गही उपोषणच्या मंडपात बसले आहेत.

## संपादकीय

# रशिया-युक्रेन युद्ध थांबेल?

रशिया आणि युक्रेन यांच्यात गेल्या दोन वर्षांहून अधिक काळापासून युद्ध सुरू आहे. कोविड कालखंडापाठोपाठ सुरू झालेल्या या युद्धाची किंमत अवघ्या जगाला मोजावी लागली आहे. हे युद्ध थांबवण्याच्या दृष्टीने मंगळवारी रशिया व अमेरिका यांच्या राजनैतिक अधिकाऱ्यांमध्ये चर्चा झाल्याने आता तरी हे युद्ध थांबेल का याकडे जगभराचे लक्ष लागले आहे.

**रशिया आणि युक्रेन यांच्या दरम्यान गेल्या दोन वर्षांहून अधिक काळ सुरू असलेले युद्ध कधी थांबते याकडे गेले अनेक दिवस अवघ्या जगाचे लक्ष लागले आहे. जगभरातील देशांच्या अर्थव्यवस्थेवर या युद्धाचे परिणाम झाले आहेत. अमेरिकेच्या अध्यक्षपदाचा कार्यभार स्वीकारल्यापासून डोनाल्ड ट्रम्प रशिया व युक्रेन दरम्यानचे युद्ध थांबवण्यासाठी प्रयत्नशील आहेत. याउलट अमेरिकेचे या आधीचे अध्यक्ष जो बायडेन यांचे धोरण रशियाला एकटे पाडण्याचे होते. परंतु ट्रम्प यांनी, हे युद्ध अमेरिकी नागरिकांचे नुकसान करणारे असल्यामुळे आपण युक्रेनला चुचकारण्याचे धोरण थांबवणार असल्याची भूमिका निवडणुकीदरम्यानच घेतली होती. ट्रम्प यांनी अलीकडेच रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन आणि युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमीर झेलेन्स्की या दोघांशीही फोनवर चर्चा केली आहे. हे युद्ध थांबवण्याच्या प्रयत्नांचा भाग म्हणून रशिया आणि अमेरिका यांच्या वरिष्ठ राजनैतिक अधिकाऱ्यांनी मंगळवारी सौदी अरबस्तानातील रियाध येथे चर्चा केली. परंतु या चर्चेत युक्रेनच्या एकाही अधिकाऱ्याला सहभागी करून घेण्यात आले नाही. ज्या चर्चेत आपला सहभाग नाही त्या चर्चेच्या फलितांना आपण मान्यता देणार नाही अशी भूमिका झेलेन्स्की यांनी या चर्चेसंदर्भात यापूर्वीच जाहीर केली आहे. रशिया आणि अमेरिका यांच्यादरम्यानचे संबंध सुधारण्याच्या दृष्टीने तसेच रशिया आणि युक्रेन दरम्यानचे युद्ध थांबवण्यासाठी या चर्चेदरम्यान वाटाघाटी केल्या जातील असे जाहीर करण्यात आले होते. एकीकडे ही चर्चा सुरू असतानाच, याच युद्धाशी संबंधित चर्चा करण्यासाठी पॅरिसमध्ये युरोपीय नेत्यांची बैठक होते आहे. गेली जवळपास तीन वर्षे अमेरिकेच्या पाठबळाच्या जोरावरच झेलेन्स्की रशियाविरोधात भूमिका घेऊन युक्रेनचे अस्तित्व टिकवून होते. ट्रम्प अध्यक्षपदी आल्यानंतर त्यांनी युक्रेनला बळ देण्याचे अमेरिकेचे धोरण बदलल्याने झेलेन्स्की आता युरोपातील देशांकडेच या युद्धात समर्थन मागत आहेत. गरज भासल्यास ब्रिटिश सैन्य युक्रेनमध्ये पाठवू असे ब्रिटनचे पंतप्रधान कीम स्टार्मर यांनी या आधीच म्हटले आहे. तसे झाल्यास अवघा युरोपच युद्धाच्या आगीत लोटला जाण्याची भीती आहे. युरोपातील बहुतेक देश अद्यापही कोविडच्या आर्थिक फटक्यातून सावरलेले नाहीत. त्यामुळे युद्ध कुणालाच परवडणारे नाही. रशियाने वरकरणी तरी युद्ध थांबवण्यास अनुकूलता दर्शविली असून, गरज भासल्यास पुतिन झेलेन्स्की यांनाही भेटण्यास तयार आहेत असेही रशियाने स्पष्ट केले आहे. गंमत म्हणजे झेलेन्स्की यांनी सोमवारी संयुक्त अरब अमिरातीचा दौरा केला. युद्ध सुरू झाल्यापासून रशिया आणि युक्रेनमधून बाहेर गेलेले अनेक जण संयुक्त अरब अमिरातीत (युएई) राहात आहेत. युएईनंतर झेलेन्स्की सौदी अरबस्तानाच्याही दौऱ्यावर जाणार आहेत, परंतु रशिया आणि अमेरिका यांच्या दरम्यानची चर्चा पार पडल्यानंतर दुसऱ्या दिवशी ते तिथे पोहोचतील. या भेटीत ते रशिया वा अमेरिका यांच्यापैकी कोणत्याही देशाच्या कुणाही अधिकाऱ्याला भेटणार नाहीत हेही लक्षात घ्यायला हवे. एकीकडे या घडामोडी सुरू असताना, रशिया व युक्रेन दरम्यानचे हल्ले मात्र अद्यापही सुरूच आहेत.**

# रोह्यातील कुंडलिका नदी संवर्धनाची गरज

खबरबात
महादेव सरसंबे



कुंडलिका नदीच्या पात्रात मोठ्या प्रमाणात गावा शहरातील सांडपाणी ते औद्योगिक क्षेत्रातील रासायनिक सांड पाणी येत असल्याने कुंडलिका नदी प्रदूषणाच्या विळख्यात सापडली आहे. भविष्यातील पिण्याच्या पाण्याचा विचार करता कुंडलिका नदीची संवर्धन करण्याची आवश्यकता आहे. याकडे लोकप्रतिनिधी लक्ष घालणार का असा सवाल पुढे येत आहे. महत्त्वाचे म्हणजे भविष्यातील पाणीटंचाई पाहता त्यावर उपाय म्हणून कुंडलिका नदी ठरू शकते. बारमाही वाहणारी स्वच्छ व निर्मळ असलेले कुंडलिका नदी आज मात्र प्रदूषणाच्या विळख्यात सापडलेली दिसून येत आहे.

रायगड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात पावसाळ्यात पाऊस पडत असल्याने जिल्ह्यातील अनेक नद्या बारमाही वाहत असतात. बारमाही वाहणाऱ्या रायगड जिल्ह्यात अनेक नद्या आहेत. त्या नद्या बारमाही वाहतात. स्वच्छ व निर्मळ पाणी रायगडकरांना देत असतात. परंतु दिवसेंदिवस वाढलेले प्रदूषणामुळे या नद्या प्रदूषित होत असल्याचे दिसून येते. यातीलच रोहा तालुक्याची जीवन वाहिनी म्हणून ओळख असलेल्या कुंडलिका नदी प्रदूषणाच्या विळख्यात सापडल्याचे दिसून येते. या प्रदूषणामुळे पिण्याच्या पाण्यापासून ते कुंडलिका नदीतील जलचर प्राण्यांचे प्रजनन क्षमता कमी होण्यापर्यंत परिणाम झाला आहे.

बारमाही वाहणारी नदी म्हणून कुंडलिका नदीची ओळख आहे. वर्षभर वाहणारी नदी पावसाळ्यात रौद्ररूप धारण करते तर उन्हाळ्यात संथ गतीने वाहत असते. पूर्वी या नदीच्या काठावर असलेल्या गावांना या नदीच्या पात्रातील पाण्याचा शेतीसह शेतीला पूरक असलेल्या दुग्ध व्यवसायासाठी जोपासत असलेल्या जनावरांना पिण्यासाठी व माणसांना पिण्यासाठी या नदीच्या पात्रातील पाण्याचा पुरेपूर उपयोग केला जात असत. त्यामुळे रोहा तालुक्यात पिण्याचा पाण्याचा प्रश्न पूर्वी उन्हाळ्यातील मार्च, एप्रिल व मे या महिन्यात कमी प्रमाणात टंचाई भासत असत.

भिरा येथुन वाहाणारी कुंडलिका नदी, रोहा तालुक्यातील सुतारवाडी, कोलाड, धाटाव, खारगाव, चणेरा पर्यंत या नदीची व्याप्ती आहे. स्वच्छ व निर्मळ वाहणारी कुंडलिका नदी औद्योगिक क्षेत्र आल्यानंतर व वाढत्या नागरिकरणांमुळे आज प्रदूषित होताना दिसत आहेत. धाटाव औद्योगिक क्षेत्रातील रासायनिक कारखान्यातून काही कारखानदार कारखान्यातील प्रदूषण युक्त रासायनिक सांडपाणी या नदीच्या पात्रात सोडत असल्याचे दिसून येते. त्यामुळे त्याचा परिणाम कुंडलिका नदीवर होत असून पाणी प्रदूषित होताना दिसत आहे.

दुसरीकडे कुंडलिका नदी पात्र लगत असलेल्या गावातील सांडपाणी थेट नदीपात्रात सोडले जात आहे. यातीलच वाढत्या नागरिकांना मुळे मोठ्या प्रमाणात सांडपाणी कुंडलिका नदीच्या पात्रात थेट सोडले जात आहे. प्रामुख्याने नदीच्या उगमापासून पासून ते नदी संपेपर्यंत या कुंडलिका नदी पात्रालगत असलेल्या गावातील सांडपाणी थेट नदीच्या पात्रात सोडल्या जात आहे. यातीलच वरसे ग्रामपंचायत व रोहा अष्टमी नगर परिषद या दोन मोठ्या वसाहती मधील मोठ्या प्रमाणात सांडपाणी या नदीच्या पात्रात थेट येत आहे. त्यामुळे नदी प्रदूषित होत आहे.

कुंडलिका नदी पात्रातील रेती उपसा, पात्रालगत बांधकाम त्यासह अन्य कारणासह कुंडलिका नदी प्रदूषित होताना दिसत आहे.

या प्रदूषणाचा थेट फटका नागरी जीवनावर व प्राण्यावर होताना दिसत आहे. पूर्वी या नदीचे पाणी कुंडलिका नदी पात्रालगत असलेल्या गावातील लोक पीत असत. आज हे पाणी पिण्यायोग्य नाही. पूर्वी मोठ्या प्रमाणात प्रदूषित पाणी आल्यामुळे काही गावातील शेत जमीन सुद्धा प्रदूषित झाली आहे. या प्रदूषणामुळे कुंडलिका नदीच्या पात्रात असलेले जलचर प्राणी यांची प्रजनन क्षमता कमी होताना दिसत आहे. त्याचा फटका कोळी समाजाच्या उदरनिर्वाहावर होताना दिसत आहे. कुंडलिका नदीच्या पात्रात मासेमारी आता जवळजवळ बंदच होत असल्याचे दिसून येते.

भविष्यातील पाणीटंचाई, वाढते नागरीकरण पाहता कुंडलिका नदी संवर्धन करण्याची गरज आहे. हे पाणी वाचवल्यास भविष्यातील वाढत्या नागरीकरणाला व औद्योगिकरणाला त्याचा लाभ होऊ शकतो. तर दुसरीकडे मोठ्या शहरांना या नदीतील पाण्याचा उपयोग होऊ शकतो त्यामुळे कुंडलिका नदी वाचवण्याची आज आवश्यकता आहे. यासाठी लोकप्रतिनिधींनी लक्ष घालण्याची आवश्यकता आहे. सरकार पाण्याचे नियोजन नदी जोड प्रकल्पातून नियोजनबद्ध करत आहे त्याच धर्तीवर कुंडलिका नदी संवर्धन करण्याची आवश्यकता आहे.

# जाणता राजा छत्रपती शिवाजी महाराज



यशवंत कीर्तिवंत।
सामर्थ्यवंत वरदवंत।
पुण्यवंत आणि जयवंत।
जाणता राजा।।

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक आणि महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांची आज जयंती... शिवरायांची गाथा प्रचंड स्फुरण देणारी, आक्रमक व तितकीच संयमी विचार यांचा सुरेख संगम असणारी... शिवरायांनी त्या काळी स्थळ, वेळ, काळ ओळखून तरुणाई अन् मनुष्यबळाचा विचार करून स्वराज्याची नवकल्पना रूजवली.

निश्चयाचा महामेरू।
बहुजनांस आधारू।
अखंड स्थितीचा निर्धारू।
श्रीमंत योगी।।

त्या कातर वेळी औरंगजेबाच्या दरबारी हजर राहण्यास जाताना तेही शंभूराजे यांना घेऊन प्रचंड धैर्य, विश्वास, योजना, परिस्थितीचे यथोचित अवलोकन करून आणि जिजाऊ व जगदंबेचा आशीर्वाद घेऊन शिवराय निघाले ते यशस्वी होऊन परत येण्यासाठीच. त्या वेळी महाराज फक्त शंभर सोबत्यांना घेऊन आले होते. त्यांचे रक्षक यांची संख्या दोनशेपासून अडीशेपर्यंत होती. महाराज बांध्याने किरकोळ दिसत, पण स्वरूपाने विलक्षण तेजपुंज. त्यांच्याकडे पाहता क्षणी कुणालाही वाटावे की हा राजाच असला पाहिजे. ते अतिशय हिमतीचे व मर्द माणूस होते. ही माहिती महाराज आग्रा येथे १६६६च्या १२ मे रोजी पोहचले त्या वेळची व त्यांच्या लावाजम्याची माहिती आपल्याला जयसिंग यांचा मुलगा रामसिंग यांच्या रजपूत अधिकाऱ्यांच्या पत्रातून मिळते. ही पत्रे राजस्थानी रेकॉर्ड्स या ग्रंथात समाविष्ट आहेत. केवढे हे अफाट सामर्थ्य व धीरोदात्त वृत्ती. आजचे दुश्मनांवर केलेले सर्जिकल स्ट्राईक व त्यातून शत्रुची जास्तीत जास्त झालेली हानी व आपले सैन्य सुखरूप परत अशी मोहीम जणु महाराजांचाच वारसा सांगणारी वाटते.

मोगलांच्या व इतर आक्रमणांना थोपवून धरणे सोपे नव्हते व त्यासाठी पुरेशी, सक्षम फौज नव्हती हे महाराज ओळखून होते. तरी ते डगमगले नाहीत, तर हुशारीने, गनिमी काव्याने शत्रूला ते सामोरे गेले आणि लढाया, मोहिमा जिंकल्या.

आई जगदंबेच्या कृपेने अन् भवानी तलवार यांच्या साक्षीने महाराजांनी एक हाक दिली... हे राज्य व्हावे ही श्रीं ची इच्छा! त्यात अनेक संकल्पना होत्या, थोर व लहान यांचा समावेश होता अन् आजही बलशाली, विकसित जगाच्या दृष्टिकोनातून भारत घडवताना प्रगतीच्या संकल्पनेत सर्वांचा समावेश आहे, हे एक महत्त्वपूर्ण साधर्म्य म्हणावयास हवे. अशा या जाणता राजाला मानाचा मुजरा!

**-संजीव काळकर, पनवेल**



## बदलते तंत्रज्ञान

# एका कॉलवर सायबर चोरटे साफ करतात बँक खाते

भारतात सायबर गुन्ह्यांमध्ये मोठी वाढ होत असल्याचे पाहायला मिळत आहे. सायबर गुन्हेगार सतत फसवणुकीसाठी वेगवेगळ्या पद्धीत अवलंबतात.




भारतात आता सायबर गुन्हेगारांनी सर्वसामान्यांना फसवण्यासाठी कॉल मर्जिंग स्कॅम या नव्या पद्धतीचा वापर सुरू केला असून, त्याद्वारे ते पीडितांना लक्ष्य करत आहेत. यामध्ये सायबर गुन्हेगार ओटीपी मिळविण्यासाठी कॉल मर्ज करतात आणि ग्राहकाचे खाते रिकामे होते.

या पद्धतीने फसवणूक करण्यासाठी सायबर चोरटे ज्या व्यक्तीला लक्ष्य करू इच्छितात त्यांना फोन करतात, त्यांना एखाद्या कार्यक्रमात उपस्थित राहण्यास किंवा नोकरीसाठी विचारपूस करतात. यावेळी ते पीडिताला सांगतात की, त्यांना त्यांचा फोन नंबर मित्राकडून मिळाला आहे. दरम्यान पहिला फोन सुरू असतानाच पीडिताला दुसरा फोन येतो, तेव्हा पहिल्या फोनवरील व्यक्ती म्हणते की, तुमचा मित्र तुम्हाला दुसऱ्या नंबरवरून कॉल करत आहे. हे ऐकून पीडित जसा दुसरा फोन उचलून मर्ज करतो त्याच क्षणाला त्याच्या बँक खात्यातून पैसे साफ होतात.

दरम्यान, सायबर गुन्हेगाराचा पहिला फोन सुरू असताना दुसरा आलेला फोन ओटीपी साठी असतो. जेव्हा दुसरा कॉल येतो तेव्हा त्या व्यक्तीला ओटीपी ऐकू येतो आणि त्यामुळे खाते रिकामे होते. दरम्यान 'ओटीपी व्हाया कॉल' या पर्यायामुळे सायबर चोरट्यांना लोकांची फसवणूक करण्याची आणखी एक पद्धत सापडली आहे. दरम्यान सायबर फसवणुकीच्या या नव्या पद्धीतीपासून वाचरण्यासाठी यूपीआयने काही सूचना जारी केल्या आहेत.

कधीही अज्ञात नंबरसह कॉल मर्ज करू नका. जेव्हा कॉल मर्ज करण्यास सांगितले जाते तेव्हा नेहमी सावधगिरी बाळगा. विशेषतः जेव्हा समोर बोलणारा व्यक्ती अनोळखी असतो.

जर कोणी तुमचे खाते असलेल्या बँकेतून किंवा ओळखीच्या लोकांच्या संपर्कातून बोलत असल्याचा दावा करत असेल, तर कोणतेही पाऊल उचलण्यापूर्वी त्यांची ओळख पटवा.

जर तुम्ही करत नसलेल्या व्यवहारासाठी ओटीपी आला, तर तुमच्या बँकेला याची तक्रार देण्यासाठी त्वरित १९३०वर कॉल करा.

# समाजसेवक गोपाळ कृष्ण गोखले



निमित्त

गोपाळ कृष्ण गोखले ह्यांचा जन्म ९ मे, १८६६ रोजी महाराष्ट्राच्या रत्नागिरी जिल्ह्यात कोतळूक येथे झाला. ह्यांच्या वडिलांचे नाव कृष्ण महादेव गोखले आणि आईचे नाव सत्यभामाबाई कृष्ण गोखले होते. त्यांचे वडील शेतकरी होते. ह्यांचे बालपण कोल्हापूर जिल्ह्यातील कागल येथे गेले. इथेच त्यांचे प्राथमिक शिक्षण देखील झाले. वडिलांच्या मृत्यूनंतर त्यांच्या वडिलबंधूं गोविंदराव ह्यांनी स्वतः चे शिक्षण सोडून पत्नीचे दागिने विकून गोपाळ कृष्ण गोखले ह्यांना उच्चशिक्षणास कोल्हापुरातील राजाराम कॉलेज आणि मुंबईच्या एल्फिस्टन कॉलेजात पाठविले.

१८८४मध्ये गणित विषयात बीएची पदवी मिळवून जानेवारी १८८५मध्ये पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये शिक्षकाची नोकरी स्वीकारली. नंतर पुण्यातील डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे आजीव सदस्यत्व,फर्ग्युसन कॉलेजात अध्यापन, १८९५मध्ये मुंबई विद्यापीठाच्या सिनेटवर फेलो म्हणून नियुक्त झाले. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस च्या सार्वजनिक सभेचे सचिव बनले. ह्यांनी शेतकऱ्यांचे कर्ज, दुष्काळ या त्रासांचा सखोल अभ्यास करून सरकार कडे निवेदन पाठविले. १९०५ साली त्यांनी भारत सेवक समाजाची स्थापना केली.गोखले पुण्यात न्यायमूर्ती रानडे ह्यांच्या संपर्कात आले. ते रानडे ह्यांच्या आर्थिक आणि राजकीय विचारांशी खूप प्रभावित झाले.न्यायमूर्ती रानडे एक महान देशभक्तआणि समाज सुधारक होते. गोपाळ गणेश आगरकर ह्यांनी सुरू केलेल्या 'सुधारक' च्या इंग्रजी आवृत्तीची जबाबदारी नामदार गोखले ह्यांनी सांभाळली.सार्वजनिक सभा, वृत्तपत्रातून ते लिखाणाद्वारे समाज सुधारणांचा पाठपुरवठा सतत करायचे.

१९०२ साली मध्यवर्तीय कायदेमंडळावर निवड झाल्यावर ते नामदार झाले. त्यांच्यातील क्षमतेला बघून व्हाईसरॉय लॉर्ड मिंटो ह्यांनी गोखले ह्यांना मोर्ले-मिंटो सुधारणा कायद्याचा मसुदा तयार करण्यास सांगितले. त्या दरम्यान त्यांनी पार्लियामेंटच्या सदस्यांना भेटून भारतातील समस्या आणि त्याचे प्रश्न त्यांच्या कानी घातले. ते भारतातील पहिल्या श्रेणीचे अर्थतज्ज्ञ होते. हे भारतामधील ब्रिटिश साम्राज्य विरोधात स्वातंत्र्य चळवळीत भाग घेणारे राजकीय आणि सामाजिक नेता होते.

आपला साधा स्वभाव, बौद्धिक क्षमता आणि देशासाठी दीर्घकाळ निःस्वार्थ सेवा करण्यासाठी त्यांना नेहमी स्मरले जाईल.

त्यांच्या राजकीय कारवायांव्यतिरिक्त, सामाजिक सुधारणांबद्दलच्या त्यांच्या खोल चिंतेमुळे त्यांनी सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटी (१९०५)ची स्थापना केली, तिचे ते संस्थापक अध्यक्ष होते. ज्याच्या सदस्यांनी गरिबी आणि वंचितांसाठी आयुष्यभर सेवेचे व्रत घेतले. त्यांनी अस्पृश्य किंवा निम्न जातीच्या हिंदूंवरील गैरवर्तनाचा विरोध केला आणि दक्षिण आफ्रिकेत राहणाऱ्या गरीब भारतीयांचे हित देखील स्वीकारले.

ते उदारमतवादी विचारसरणीचे अग्रगण्य घटक होते.ते १९०५मध्ये स्वातंत्र्याच्या पक्षात लाला लाजपतराय ह्यांचासह इंग्लंडला गेले आणि अतिशय प्रभावी पणे देशाच्या स्वतंत्रते बद्दल बोलले. १९ फेब्रुवारी १९१५ रोजी गोपाळ कृष्ण गोखले ह्यांचे निधन झाले. (साभार : इंटरनेट)

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# फेअरनेस क्रीमचा होतो किडनीवर गंभीर परिणाम

फेअरनेस क्रीम्स मोठ्या प्रमाणात वापरल्या जातात पण, तपासणीशिवाय बाजारात विकल्या जाणाऱ्या क्रीम्स तुमच्या त्वचेसाठी सुरक्षित नसतात. त्यात पाऱ्यासारखे हानिकारक पदार्थांचे प्रमाण जास्त असते, जे मूत्रपिंडावर गंभीर परिणाम करतात. तसेच त्यातील ग्लुटाथिओनचे अधिक प्रमाणदेखील किडनी आणि मूत्रपिंडासाठी हानिकारक आहे.



फेअरनेस क्रीम्सच्या वापरानंतर मूत्रातून प्रथिनगळती होण्याचे लक्षण असलेल्या नेफ्रॉटिक सिंड्रोमची प्रकरणे आढळून आली. परंतु, रुग्णांनी वापरलेल्या सर्व क्रीम्समध्ये लेबल, ब्रँडचे नाव किंवा त्यांच्यात वापरलेल्या घटकांबद्दलची माहिती नव्हती. या रुग्णांच्या रक्तातील पाऱ्याची पातळी वाढल्याचे दिसून आले. त्यावरून असे दिसून येते की, या फेअरनेस क्रीम्सची कुठलीही तपासणी केली गेलेली नव्हती आणि नियामक एजन्सीने त्या प्रमाणित केलेल्याही नव्हत्या. त्यामुळे या क्रीम्समध्ये पाऱ्याचे प्रमाण मर्यादेपलीकडे होते. त्यामुळे या क्रीम्स वापरणाऱ्या लोकांच्या त्वचेद्वारे पारा शरीरात शोषला गेला आणि त्यांना किडनीसंबंधित समस्या जाणवू लागल्या.

या क्रीम्समध्ये रासायनिक पदार्थच इतके वापरले जातात की, ज्यामुळे त्वचेसह शरीरातील इतर अवयवांवरही त्याचा परिणाम होत असतो. जेव्हा पारा त्वचेद्वारे शोषला जातो तेव्हा तो मूत्रपिंडांपर्यंत पोहोचतो आणि मूत्रपिंडाच्या शुद्धीकरण प्रक्रियेत गडबड निर्माण करतो. त्यामुळे शरीराच्या स्वतःच्या उतींना आणि मूत्रपिंडात असलेल्या प्रथिनांना लक्ष्य करणाऱ्या अँटीबॉडीजचे उत्पादन सुरू होते. परिणामी रोगप्रतिकार शक्तीवर विपरीत परिणाम होतो. हे असेच सुरू राहिल्यास भविष्यात मूत्राशयासंबंधित आजारांचा धोका अधिक वाढतो.

केरळमधील प्रकरणांतून असे लक्षात आले की, बहुतेक रुग्णांनी फेअरनेस क्रीम वापरणे बंद केल्याने मूत्रमार्गातील प्रथिनाच्या गळतीचे प्रमाण लक्षणीयरीत्या कमी होते. रुग्णांच्या एका लहान गटाला ऑटो-अँटीबॉडी उत्पादन रोखण्यासाठी आणि मूत्रपिंडाचे पुढील नुकसान कमी करण्यासाठी रोगप्रतिकार-दमन थेरपीची आवश्यकता असू शकते. या प्रक्रियेदरम्यान, मूत्रमार्गातील प्रथिनांची पातळी नियंत्रित करण्यासाठी अँटीहायपरटेन्सिव्ह औषधे आणि नॉन-इम्युनोसप्रेसिव्ह औषधे दिली जातात.

महाराष्ट्र शासन राजपत्र भाग एक– कोकण विभागीय पुरवणी, गुरुवार ते बुधवार, डिसेंबर २६, २०२४–जानेवारी १, २०२५/पौष ५–११, शके १९४६

## उप विभागीय अधिकारी पनवेल, उप विभाग पनवेल
## अधिसूचना

**भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.**

क्रमांक उविअ/कात–५/भूसं/पनवेल/३२७६/२०२४. ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्रमांक संकीर्ण ११/२०१४/प्र.क्र.७७/अ–२, दिनांक १९ जानेवारी, २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश निर्देश उक्त अधिसूचना असा करण्यात आला आहे) याद्वारे असे अधिसूचित केले आहे को, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड भे) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील ५०० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरीता भूमीसंपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी, समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या, रायगड जिल्ह्याच्या जिल्हाधिका–यास यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश उक्त जमीन असा करण्यात आला आहे) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश सार्वजनिक प्रयोजन असा करण्यात आला आहे) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे असे वाटते, ज्याच्या स्वरुपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची दोनमध्ये दिलेले आहे, आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट–कलम (१) च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमि संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची तीन मध्ये दिलेली आहेत. (विस्थापन होणार असेल तर या अनुसूचीमध्ये कारणे नमुद करावीत.)

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील, यासोबत जोडलेल्या अनुसूची पाचमध्ये दिलेला आहे. (नियुक्ती कारणे आवश्यक असेल तर, या अनुसूचीमध्ये तपशील नमूद करावा.)

त्याअर्थी आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट–कलम ४ अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही.

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिका–यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करून अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल.

परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुद्धीपुरस्पर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिका–यांकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट–कलम (५) अनुसार, जिल्हाधिकारी भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्यांचा निर्देश उक्त नियम असा करण्यात आला आहे) नियम १० च्या उप–नियम (३) द्वारे विहीत केल्याप्रमाणे भूमि अभिलेखाच्या अद्ययावती करणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (ग) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिका–यांची कार्य पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी पनवेल, उपविभाग पनवेल, (जुना ठाणानाका) यास पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसूची– एक**
**जमिनीचे वर्णन**
**गाव पनवेल, ता. पेण, जिल्हा रायगड**

| अ.क्र. (१) | अ.भू.क्रं (२) | संपादीत क्षेत्र (चौ.मी) (३) |
|---|---|---|
| १ | १३०५/ब | ९०.३४ |
| २ | १३०९/० | ३.०० |
| ३ | १३१८ | २.५४ |
| ४ | १३१९/२ | १.०० |
| ५ | १३४९/३ | |
| ६ | १३११/४ | |
| ७ | १३११/५ | |
| ८ | १३१९/६ | |
| ९ | १३१९/७ | |
| १० | १३१९/८ | |
| ११ | १३२३/१ | १.०० |
| १२ | १३२३/२ | १.८० |
| १३ | १३२५ | ३.८३ |
| १४ | १३२५/१ | ५.३० |
| १५ | १३२६ | ६.८८ |
| १६ | १३३२ | १२.९८ |
| १७ | १३३३/अ | ५.३० |
| १८ | १३३३/ब | |
| १९ | १३३३/क | |
| २० | १३४८/ब/१ | |

| अ.क्र. (१) | अ.भू.क्रं (२) | संपादीत क्षेत्र (चौ.मी) (३) |
|---|---|---|
| २१ | १३४८/ब/२ | ३६.५३ |
| २२ | १३५४/३ | |
| २३ | १३४६/ब/४ | |
| २४ | १३४८/ब/५ | |
| २५ | १३४९/० | ६८.९० |
| २६ | १३५१/१ | ४७.४७ |
| २७ | १३५२/० | ५७.०० |
| २८ | १३५४/१/अ | ११५.९० |
| २९ | १३५५/० | ४.५० |
| ३० | १३५६/अ | ६२.,०० |
| ३१ | १३५६/ब | |
| ३२ | १३५८+१४२४ | ६१.९० |
| ३३ | १३५९/० | १३.४४ |
| ३४ | १३५९/१ | १३.८४ |
| ३५ | १३७३/० | ४१.६२ |
| ३६ | १३९०/क | ६०.५८ |
| ३७ | १३९०/ड | |
| ३८ | १३९१/० | १६३.८८ |
| ३९ | १३९३/ब | संपूर्ण |
| ४० | अ.भू.क्र.१३० | न.भू.क्र. प्रमाणे २५८.०० |
| | **एकूण** | **११३९.४० चौ.मी** |

**अनुसूची–दोन**
**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण**

अधिसूचना :– प्रकल्पाचे नाव :– मौजे–पनवेल, ता. पनवेल येथील राम गणेश गडकरी मार्ग (आदर्श हॉटेल ते सावरकर चौक) ११३९.४० चौ. मी. रस्ता रुंदीकरण प्रयोजनासाठी.

निर्गमित प्रकल्प कार्याचे वर्णन :– मौजे–पनवेल, ता. पनवेल येथील राम गणेश गडकरी मार्ग (आदर्श हॉटेल ते सावरकर चौक) न.भू.क्रं. १३०५/अ ते अ.भू.क्र.१३० संयुक्त विवरणपत्रात नमूद केलेल्या मिळकतीप्रमाणे एकूण क्षेत्र ११३९.४० चौ.मी. रस्ता रुंदीकरण बांधकाम जलद गतीने करणेसाठी आवश्यक आहे.

करण्यापूर्वी :– समाजाला मिळणारे लाभ :– पनवेल शहराचे औद्योगिक महत्व व नागरीकरण तसेच विकास आणि विस्तार वेगाने होत असल्याने प्रस्तावित करण्यांत आलेले क्षेत्र संपादन केलेखेरीज समाजाची उन्नती होऊ शकणार नाही. त्यामुळे सार्वजनिक रहदारीसाठी रस्ता रुंदीकरण करणे आवश्यक आहे.

*** येथे मजकूर भरावा (आर्थिक रोजगार, पायाभूत, सूविधा, सोयीसुविधा व इतर लाभासंबंधात)

**अनुसूची–तीन**

बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे :– निरंक

**अनुसूची–चार**

सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश :– मौजे–पनवेल, ता. पनवेल राम गणेश गडकरी मार्ग (आदर्श हॉटेल ते सावरकर चौक) ११३९.४० चौ.मी. रस्ता रुंदीकरण करणे आवश्यक आहे.सदर भूसंपादन प्रक्रिया लवकरात लवकर सुरु करावी.

नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील :– निरंक

टीप :– उक्त जमिनीच्या आराखड्याचे उपविभागीय अधिकारी, उप विभाग पनवेल यांचे कार्यालयामध्ये निरिक्षण करता येईल.

**पनवेल,**
**दिनांक २४ डिसेंबर २०२४**

**सही/–**
**पवन चांडक,**
**उप विभागीय अधिकारी पनवेल,**
**उप विभाग पनवेल.**

**उप विभागीय अधिकारी पनवेल, उप विभाग, पनवेल**
**अधिसूचना**
**भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.**

क्रमांक उविअ/कात–५/भूसं/पनवेल /३२७७/२०२४. ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (३) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्रमांक संकीर्ण ११/२०१४/प्र.क्र.७७/अ–२, दिनांक १९ जानेवारी, २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश उक्त अधिसूचना असा करण्यात आला आहे.) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड अं) मध्ये व्याख्या केलेल्या एखादया सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्हयातील ५०० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरीता भूमीसंपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी, समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या, रायगड जिल्ह्याच्या जिल्हाधिका–यास यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश उक्त जमीन असा करण्यात आला आहे) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश सार्वजनिक प्रयोजन असा करण्यात आला आहे) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे असे वाटते, ज्याच्या स्वरुपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची दोनमध्ये दिलेले आहे, आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट–कलम (१) च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमि संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची तीन मध्ये दिलेली आहेत. (विस्थापन होणार असेल तर या अनुसूचीमध्ये कारणे नमुद करावीत.)

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट–कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील, यासोबत जोडलेल्या अनुसूची पाचमध्ये दिलेला आहे. (नियुक्ती कारणे आवश्यक असेल तर, या अनुसूचीमध्ये तपशील नमूद करावा.)

त्याअर्थी आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट–कलम ४ अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही.

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिका–यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करून अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल.

(पान ६ वर..)

(पान ५ वरून)

परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुद्धीपुरस्पर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिका–यांकडून भरपाई दिली जाणार नाही. तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट–कलम (५) अनुसार, जिल्हाधिकारी भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्यांचा निर्देश उक्त नियम असा करण्यात आला आहे) नियम १० च्या उप–नियम (३) द्वारे विहीत केल्याप्रमाणे भूमि अभिलेखाच्या अद्ययावती करणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (ग) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिका–यांची कार्य पार पाडण्यासाठी उप विभागीय अधिकारी पनवेल, उपविभाग पनवेल, (जुना ठाणानाका) यास पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसूची– एक**
**जमिनीचे वर्णन**
**गाव पनवेल, ता. पनवेल, जिल्हा रायगड**

| अ.क्र. (१) | अ.भू.क्रं (२) | संपादीत क्षेत्र (चौ.मी) (३) |
|---|---|---|
| १ | १२६३/अ | १६३.४० |
| २ | १२६३/ब | |
| ३ | १२६४/० | १,०० |
| ४ | १२६५/० | ४.४४ |
| ५ | १२६६/० | ७७.६५ |
| ६ | १२६७/० | ५१.९७ |
| ७ | १२६८/१ | |
| ८ | १२६८/A | १५३.६५ |
| ९ | १२६८/B | |
| १० | १२६९अ | |
| ११ | १२६९/ब/१ | ११६.३५ |
| १२ | १२६९/ब/२ | |
| १३ | १२७१/अ | ६८.८२ |
| १४ | १२७१/व | |
| १५ | १२७२/१ | ७.८८ |
| १६ | १२७६/० | ७८.६४ |
| १७ | १२७८/अ | १००,०० |
| १८ | १२७९/० | २२.७० |
| १९ | १२७९/१ | ६.११ |
| २० | १२७९/२अ | २४.७२ |
| २१ | १२७९/२अ/२ | |
| २२ | १२९८/अ | २८.०४ |
| २३ | १२९८/ब | |
| २४ | १३००/अ | ७.०१ |
| २५ | १३०१/३ | ५.०४ |
| २६ | १३०२/१ | ६.८४ |
| २७ | १३०२ | २.२९ |
| २८ | १३०३/० | ३०.९३ |
| २९ | १३०४/० | ३२.८० |
| ३० | १३०५/A | ९०.३४ |
| ३१ | १३०५/B | २.०७ |
| ३२ | ४९९/१ | |
| ३३ | ४९९/२ | ६७.२६ |
| ३४ | ६३० | २३.१९ |
| ३५ | ६५१/अ/१ | ७८.९५ |
| ३६ | ६५१/अ/२ | |
| ३७ | ६५२ | १४.५३ |
| ३८ | ६५३ | २६.४३ |
| ३९ | ६५४ | १०१.८९ |
| ४० | ६५५ | ३३.०५ |
| ४१ | ६५६ | ३५.३४ |
| ४२ | ६५७ | ६७.२८ |
| ४३ | ६५८ | ३२८.०५ |
| ४४ | ६५९ | ४८.७४ |
| ४५ | ६६० | ३०.५९ |

| अ.क्र. (१) | अ.भू.क्रं (२) | संपादीत क्षेत्र (चौ.मी) (३) |
|---|---|---|
| ४६ | ६६१/० | २३.४० |
| ४७ | ६६४/अ/१ | |
| ४८ | ६६४/अ/२ | ३९.२९ |
| ४९ | ६६४/ब | |
| ५० | ६६५/अ | १६.८६ |
| ५१ | ६६५/१/ब | |
| | ६६६/ड | २६.७४ |
| ५२ | ६६६/फ | |
| ५३ | ६६६/ज | |
| ५४ | ६६८/अ | ४०.०० |
| ५५ | ६६८/क | |
| ५६ | ६६९/A | |
| ५७ | ६६९/B | ७.९७ |
| ५८ | ६६९/C | |
| ५९ | ६७०/० | १.०० |
| ६० | ६७१/अ | |
| ६१ | ६७१/ब | ४८.४३ |
| ६२ | ६७३/A | ९.१८ |
| ६३ | ६७३/B | |
| ६४ | ६७४+६७१/फ/अ | ६४.५३ |
| ६५ | ६७४+६७१/फ/ब | |
| ६६ | ६७४+६७१/फ/क | |
| ६७ | ६८४/१ | १२ |
| ६८ | ६८४/० | १०.६६ |
| ६९ | ६८१/० | १.२६ |
| ७० | ६८३/० | २६.७९ |
| ७१ | ६८४/२ | १३.२७ |
| ७२ | ६८५/० | ३०.९० |
| ७३ | ६८६/अ | २५.४९ |
| ७४ | ६८७+६८६ब | |
| ७५ | ६८८/अ | १०.७२ |
| ७६ | ६८८/ब | |
| ७७ | ६८८/क | |
| ७८ | ६८९/० | ५.२८ |
| ७९ | ६९३/अ | ३.३७ |
| ८० | ६९३/ब | |
| ८१ | ६९७/० | ३.१९ |
| ८२ | ६९८/० | ७.३९ |
| ८३ | ६९९/० | ६.९५ |
| ८४ | ७००/२ | ८.१६ |
| ८५ | ७०१/अ | १३.१४ |
| ८६ | ७०१/ब | |
| ८७ | ७०१/क | |
| ८८ | ७००/० | ७.१२ |
| ८९ | ७००/१ | २.४३ |
| | **एकूण** | **२४०३.९७ चौ.मी.** |

**अनुसूची–दोन**
**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण**

अधिसूचना: प्रकल्पाचे नाव :– मौजे–पनवेल, ता. पनवेल येथील महात्मा ज्योतिबा फुले मार्ग (जय भारत नाका–विरुपाक्ष मंदिर ते स्वातंत्र्यवीर चौक) २४०३.९७ चौ.मी. रस्ता रुंदीकरण प्रयोजनासाठी.

निर्गमित प्रकल्प कार्याचे वर्णन : मौजे–पनवेल, ता. पनवेल येथील महात्मा ज्योतिबा फुले मार्ग (जय भारत नाका–विरुपाक्ष मंदिर ते स्वातंत्र्यवीर चौक) न.भू.क्रं.१२६३/अ ते ७००/१ संयुक्त विवरणपत्रात नमूद केलेल्या मिळकतीप्रमाणे एकूण क्षेत्र २४०३.९७ चौ. मी. रस्ता रुंदीकरण बांधकाम जलद गतीने करणेसाठी आवश्यक आहे.

करण्यापूर्वी :– समाजाला मिळणारे लाभ :– पनवेल शहराचे औद्योगिक महत्व व नागरीकरण तसेच विकास आणि विस्तार वेगाने होत असल्याने प्रस्तावित करण्यांत आलेले क्षेत्र संपादन केलेखेरीज समाजाची उन्नती होऊ शकणार नाही. त्यामुळे सार्वजनिक रहदारीसाठी रस्ता रुंदीकरण करणे आवश्यक आहे. *** येथे मजकूर भरावा (आर्थिक रोजगार, पायाभूत, सूविधा, सोयीसुविधा व इतर लाभासंबंधात).

**अनुसूची–तीन**

बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे :– निरंक

**अनुसूची–चार**

सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश :– मौजे–पनवेल, ता. पनवेल महात्मा ज्योतिबा फुले मार्ग (जय भारत नाका– विरुपाक्ष मंदिर ते स्वातंत्र्यवीर चौक) २४०३.९७ चौ.मी. रस्ता रुंदीकरण करणे आवश्यक आहे.

सदर भूसंपादन प्रक्रिया लवकरात लवकर सुरू करावी.

नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील :– निरंक

टीप : उक्त जमिनीच्या आराखड्याचे उपविभागीय अधिकारी, उप विभाग पनवेल यांचे कार्यालयामध्ये निरिक्षण करता येईल.

**पनवेल,**
**दिनांक २४ डिसेंबर २०२४**

**सही/–**
**पवन चांडक,**
**उप विभागीय अधिकारी पनवेल,**
**उप विभाग पनवेल.**

## उप विभागीय अधिकारी पनवेल, उप विभाग पनवेल

**अधिसूचना**

**भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.**

क्रमांक उविअ/कात–५/मूर्स/पनवेल /३२७८/२०२४. ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्रमांक संकीर्ण ११/२०१४/प्र.क्र.७७/अ–२, दिनांक १९ जानेवारी, २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश उक्त अधिसूचना असा करण्यात आला आह) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड अं) मध्ये व्याख्या केलेल्या एखादया सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील ५०० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरीता भूमीसंपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी, समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या, रायगड जिल्हयाच्या जिल्हाधिका–यास यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश उक्त जमीन असा करण्यात आला आहे) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश सार्वजनिक प्रयोजन असा करण्यात आला आहे) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे असे वाटते, ज्याच्या स्वरूपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची दोनमध्ये दिलेले आहे, आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट–कलम (१) च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमि संपादनाच्या अनुषंगाने चाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची तीन मध्ये दिलेली आहेत. (विस्थापन होणार असेल तर या अनुसूचीमध्ये कारणे नमुद करावीत.)

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट–कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील, यासोबत जोडलेल्या अनुसूची पाचमध्ये दिलेला आहे. (नियुक्ती कारणे आवश्यक असेल तर, या अनुसूचीमध्ये तपशील नमूद करावा.)

त्याअर्थी आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट–कलम ४ अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा

अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही.

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिका–यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करून अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल.

परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुद्धीपुरस्पर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिका–यांकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट–कलम (५) अनुसार, जिल्हाधिकारी भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्यांचा निर्देश उक्त नियम असा करण्यात आला आहे) नियम १० च्या उप–नियम (३) द्वारे विहीत केल्याप्रमाणे भूमि अभिलेखाच्या अद्ययावती करणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (ग) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिका–यांची कार्य पार पाडण्यासाठी उप विभागीय अधिकारी पनवेल, उपविभाग पनवेल, (जुना ठाणानाका) यास पदनिर्देशित करीत आहे.

(पान ७ वर..)

# भिसेखिंड ते निडी रस्त्यावर पांढरा पट्टा गरजेचा

## त्रस्त वाहनचालकांची मागणी

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे ते रोहादरम्यानच्या भिसेखिंडी मार्गावरील रस्ता वाहतुकीसाठी दिवंसेदिवस असुरक्षित बनत चाललेला असतानाच मुंबई-गोवा हायवेवरील वाकण नाकानजिकच्या आमडोशी गावाहून रोहाकडे जाणारा रस्ता नव्याने तयार करण्यात आला असून सदर रस्ता तयार होऊन एक वर्ष उलटून गेले तरी अद्यापही या रस्त्यावर वाहतुकीच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक असणारा पांढरा पट्टा मारण्यात आलेला नाही.

या पांढऱ्या बिनपट्ट्याच्या रस्त्यावरून अंधारात तसेच पहाटे दाट धुक्यात वाहने चालवताना चालकांना फार मोठी कसरत करावी लागत आहे. त्यामुळे अनेक वाहनचालकांना अत्यावश्यक अशा पांढऱ्या पट्ट्याची प्रतीक्षा आहे.

दरम्यान, आमडोशीपासून रोह्याजवळील निडी गावापर्यंत नवीन रस्ता तयार होऊन सुमारे एक वर्ष उलटून गेले तरी या रस्त्यावर अजूनही वाहतुकीसाठी आवश्यक अशा मार्गदर्शक सूचना देणारे सूचनाफलक, दिशादर्शक तसेच काही ठिकाणी संरक्षक कठडे पुरेसे नाहीत. वाहतुकीसाठी रस्त्यावर असणाऱ्या आवश्यक बाबी यांकडे वाहतूक पोलिसांनी लक्ष देणे गरजेचे आहे.

नागोठणे-रोहा दरम्यानच्या भिसे खिंडीतील रस्त्याला ठिकठिकाणी धोकादायक अपघाती वळणे आहेत. यामुळे या वळणांवरून रात्री तसेच पहाटेचे वेळी दाट धुक्यातून मार्गस्थ होताना पांढऱ्या रंगाच्या पट्ट्याच्या अभावाने वाटचालकांना रस्त्याचा अंदाज येत नसल्याने अपघात घडत आहेत. काही वाहने रस्त्याच्या खाली उतरून अपघात होत आहेत. शिवाय भिसे खिंडीतील रस्तादेखील अरुंद आहे.

या रस्त्यावरून अनेक प्रकारची मोठी अवजड मालवाहू वाहने, महामंडळाच्या बसेस दररोज ये जा करतात. त्यामुळे या रस्त्यावरील वाहतूक असुरक्षित होताना दिसत आहे. त्यामुळे पांढरे पट्टे मारण्याची नितांत गरज आहे. म्हणून लवकरात लवकर रस्त्याच्या कडेला दोन्ही बाजूने पांढरा पट्टा मारला जावा, अशी मागणी चालकांकडून होत आहे. तसेच रस्ता व बांधकाम विभागामार्फत या बाबीकडे कटाक्षाने लक्ष घालून दुभाजक व रस्त्याच्या कडेला धोकादायक वळणांवर रिफ्लेक्टर बसवावे, अशी मागणी त्रस्त नागरिकांकडून जोर धरू लागली आहे.




SOUTH INDIAN Bank

Shop No.02-06, Panacea Hospital Building, Ground Floor, Doctors House, Gurudwara, Sector -08, Plot No. 105,106, New Panvel, Raigad, Maharashtra - 410206

**GOLD AUCTION NOTICE**

| Sr.No. | LOAN NO. | NAME |
|---|---|---|
| 1 | 1007653000000625 | SHALU ROHIT GUPTA |
| 2 | 1007653000000626 | SHALU ROHIT GUPTA |
| 3 | 1007653000001079 | PRASHANT DHONDIRAM MANE |
| 4 | 1007653000000755 | SREEJA JAYARAJAN |

Gold Auction will be conducted on Friday 28.02.2025, 11:00 a.m at the Bank Premises. Those desirous of participating in the auction should remit Rs.1000/- before 11:00 am on 28.02.2025. Please contact Branch Manager.

Date : 19/02/2025

sd/-
Branch Manager


## पनवेल महानगरपालिका

ता. पनवेल, जि.रायगड ४१०२०६

### व्दितीय जाहिर ई - निविदा सुचना सन २०२४ -२०२५

जा.क्र.पमपा/जनसंपर्क/३१२५/प्र.क्र.७०/७०/२०२५ दिनांक :- १७/०२/२०२५

पनवेल महानगरपालिकेस सन २०२४-२५ या वित्तिय वर्षा करिता निविदापत्रकांत नमुद केलेनुसार पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग निहाय मुली व महिलांना (चार चाकी वाहन चालविणे, शिकाऊ परवान्यासह) व्यावसायिक प्रशिक्षण देणेकामी पात्र व इच्छुक प्रशिक्षण संस्था/ नोंदणीकृत पुरवठाधारक व प्रशिक्षित असलेल्या संस्था यांच्या कडून सदर कामी निविदा मागविण्यात येत आहेत. याकामी कोरे निविदा प्रपत्र www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

सही/-
अतिरिक्त आयुक्त
पनवेल महानगरपालिका

## रोहा नगर परिषद

ता. रोहा, जि.रायगड पिन कोड नं. ४०२१०९
फोन नं. कार्यालय - ०२१९४/२३५७३७ फॅक्स नं. ०२१९४/२३४०७८
email : rohanagarpalika@ gmail.com

क्र.रोनप//नि.सु./पंप दुरुस्ती/१६२१/२०२४-२५ दिनांक १८/०२/२०२५

### जाहीर निविदा सूचना

रोहा नगर परिषद रोहा यांजकडून रोहा नगर परिषदेच्या पाणीपुरवठा विभागास खालिल नमुद केलेल्या कामांसाठी अनुभवी व इच्छुक ठेकेदारांकडून निविदा दरपत्रक मागविणेत येत आहेत.

| अ.क्र | कामाचे नांव | इसारा रक्कम (रूपये) | कोरी निविदा फॉर्म फी | काम पुर्ण करणेची मुदत |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | रोहा नगर परिषदेच्या डोलवहाळ संप व पंप हाऊस येथील १५० एच.पी. व्ही.टी. पंपाची व नदी संवर्धन गार्डन मधील ५ एच.पी. सबमर्सिबल पंप यांची देखभाल व दुरूस्ती करणे | ५००० | ५०० | कामाचे आदेश दिलेपासून ३० दिवस. |

**निविदा अटी / शर्ती :-**

१) विहीत नमुन्यातील सर्व अटी शर्तीसह निविदा पत्रे/फॉर्मची विक्री नगर परिषद कार्यालय, रोहा येथे कार्यालयीन वेळेत दिनांक २०-०२-२०२५ पासून २७-०२-२०२५ रोजीपर्यंत कार्यालयिन वेळेत दुपारी ४.०० वाजेपर्यंत कामकाजाचे दिवशी रक्कम रुपये वर नमुद केलेप्रमाणे नगर परिषद कार्यालयात रोखीने भरणा करुन निविदा पत्रे/फॉर्म प्राप्त करुन घेता येतील.
२) याकामी बयाणा/इसारा रक्कम रोखीने दिनांक २०-०२-२०२५ पासून २७-०२-२०२५ रोजी पर्यंत कार्यालयिन वेळेत दुपारी ३.०० वाजेपर्यंत कामकाजाचे दिवशी रक्कम रुपये वर नमुद केलेप्रमाणे नगर परिषद कार्यालयात रोखीने भरणा करावी.
३) विहीत निविदा पत्रके वेगवेगळ्या दोन सिलबंद लखोट्यात लखोटा क्र.१ व लखोटा क्र.२ सिलबंद करून दोन्ही लखोटे एका मोठ्या लखोट्यामध्ये सिलबंद करून अशा लखोट्यावर करावयाचे कामाचे नाव ठळक अक्षरात नमूद करून मुख्याधिकारी, रोहा नगर परिषद, रोहा, यांचे कार्यालयात दिनांक २०-०२-२०२५ पासून २७-०२-२०२५ दुपारी ४.०० वाजेपर्यंत किंवा तत्पूर्वी दाखल करता येतील.
४) जी.एस.टी. (वस्तु व सेवा कर) कराचा पडणाऱ्या भाराचा विचार करूनच निविदेतील दर सर्व करांसहित असावेत. बिलाची आकारणी केलेनंतर कर अतिरिक्त अनुज्ञेय राहणार नाहीत
५) लखोटा क्रमांक १ उघडून निविदा फॉर्ममध्ये नमुद केलेल्या आवश्यक त्या कागदपत्रांची छाननी केली जाईल व पात्र अथवा अपात्र निविदा बाबत अभिप्राय नोंदविल्यानंतर केवळ पात्र निविदांचा लखोटा क्रमांक २ शक्यतो दिनांक २७-०२- २०२५ रोजी सायंकाळी ५.०० वा किंवा प्रशासकिय सोईनुसार निविदाधारकांसमोर किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधींसमोर करणेत येईल
६) कोणतेही कारण नमुद न करून अथवा असे कारण न देता आलेल्या एक अथवा सर्व निविदा स्विकारणे अथवा फेटाळणेचा अधिकार नगर परिषदेने राखून ठेवला आहे.
७) विषयांकीत कामाचे देयक ठेकेदारास नगर परिषदेकडे जसा निधी उपलब्ध आसेल त्या प्रमाणात अदा करणेत येईल.
८) निविदे संदर्भात काही माहिती हवी असल्यास कार्यालयिन वेळेत नगर परिषद कार्यालयातील विद्युत विभागात संपर्क करून अथवा प्रत्यक्ष कार्यालयात उपस्थित राहून माहिती घ्यावी.

सही/-
मुख्याधिकारी
रोहा नगर परिषद

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

ई निविदा सूचना क्रमांक ७९/२०२४-२०२५ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्र राज्यातील दिघी बंदर औद्योगिक क्षेत्र, ता.माणगाव व रोहा, जिल्हा रायगड येथे होणाऱ्या हायटेक फार्मास्युटिकल पार्कचा विकास, संचलन, देखभाल आणि व्यवस्थापनासाठी बांधा, वापरा व हस्तांतरीत करणे (पीपीपी) या तत्वावर विकासकाची निवड करण्यासाठी प्रस्ताव (आरएफपी) ची विनंती. (दुसरी मागणी) | ०.०० |

उपरोक्त कामाकरीता निविदा प्रपत्र दिनांक १८/०२/२०२५ ते दिनांक ०३/०३/२०२५ पर्यंत महामंडळाच्या http://www.midcindia.org या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामाबाबत दिनांक २१/०२/२०२५ पूर्वी त्यांचे प्रश्न महामंडळाच्या संकेत स्थळावर नोंदवावेत. पुर्व अहर्ता बैठक दिनांक २५/०२/२०२५ रोजी मुख्य अभियंता (मुख्या.), मऔविम, उद्योग सारथी, महाकाली गुंफा मार्ग, अंधेरी (पुर्व), मुंबई-९३ यांचे कार्यालयात आयोजित करण्यात आली आहे. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक २८/०२/२०२५ पासून महामंडळाच्या संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

(पान ६ वरून)

| अ.क्र. (१) | अ.भू.क्रं (२) | संपादीत क्षेत्र (चौ.मी) (३) |
|---|---|---|
| १ | ४५२ | ३७.२८ |
| २ | ४५८/क | ३३.०९ |
| ३ | ४५९/१ | ३७.७० |
| ४ | ४५९/२ | |
| ५ | ४५९/३ | |
| ६ | ४५९/४ | |
| ७ | ४६२ | ६.४१ |
| ८ | ५००/१ | ५३.५० |
| ९ | ५००/२ | २२.५९ |
| १० | ५००/३ | ७.१७ |
| ११ | ५०२/० | १८७.३० |
| १२ | ५०३/० | ४०.१० |
| १३ | ५८०/० | ३.०९ |
| १४ | ५८२/१ | १.०० |
| १५ | ५८२/ब | १६.४६ |
| १६ | ५८८ | १३.३६ |
| १७ | ५८९/० | १७.७८ |
| १८ | ५९०/१ | ७.६८ |
| १९ | ५९१/० | ६०.८७ |
| २० | ५९३/अ | ३३.५६ |
| २१ | ५९३/ब | |
| २२ | ५९५/० | २३.७८ |
| २३ | ५९६/० | ९०.२७ |
| २४ | ५९७/अ | २२.८३ |
| २५ | ५९७/ब | |
| २६ | ५९८/अ/१ | १.०० |
| २७ | ५९८/ब/१ | |
| २८ | ५९८/क | |
| २९ | ५९९/० | १.०० |
| ३० | ६०१/० | ०.५० |
| ३१ | ६०२/१ | १७८.४६ |
| ३२ | ६०२/२ | |
| ३३ | ६०२/३ | |
| ३४ | ६०२/३/२ | |
| ३५ | ६०२/३/३ | |
| ३६ | ६०२/३/४ | |
| ३७ | ६०२/४/१ | |
| ३८ | ६०२/४/२ | |
| ३९ | ६०२/६ | |

| अ.क्र. (१) | अ.भू.क्रं (२) | संपादीत क्षेत्र (चौ.मी) (३) |
|---|---|---|
| ४० | ६०३/१अ | ३३.४१ |
| ४१ | ६०३/१ड | |
| ४२ | ६०३/१क | |
| ४३ | ६०३/अ/१ | |
| ४४ | ६०३/अ/२ | |
| ४५ | ६०३/ब | |
| ४६ | ६०४/० | ६.६२ |
| ४७ | ६०५/१ब | ३०.५९ |
| ४८ | ६०५/अ | |
| ४९ | ६०५/ब | |
| ५० | ६०६/अ | ३२.८९ |
| ५१ | ६०६/ब | |
| ५२ | ६०८/० | ४०.११ |
| ५३ | ६१०/० | ३५.११ |
| ५४ | ६११/० | १४.५० |
| ५५ | ६१४/० | ४६.२२ |
| ५६ | ६१९/० | २३.८१ |
| ५७ | ६१९/१ | ११.५४ |
| ५८ | ६१९/२ | २२.०३ |
| ५९ | ६१९/३ | २१.५५ |
| ६० | ६२०/० | १.०० |
| ६१ | ६२०/१ | ०.७५ |
| ६२ | ६२०/२ | १.०० |
| ६३ | ६२०/३ | ०.५० |
| ६४ | ६२०/४ | ०.२५ |
| ६५ | ६२०/५ | ०.२५ |
| ६६ | ६२०/६ | ०.१० |
| ६७ | ६२०/७ | ०.१० |
| ६८ | ६२०/८ | ०.२० |
| ६९ | ६२४ | १.५० |
| ७० | ६२५/० | ८.२२ |
| ७१ | ६२७ | ९९.०७ |
| ७२ | ६३२/० | १२६.९३ |
| ७३ | ६३५/१ | १२२.२८ |
| ७४ | ६४५/१ | १५२.८८ |
| ७५ | ६४६/३ | ३.१० |
| ७६ | ६४६/अ | |
| ७७ | ६४६/क | |
| ७८ | ६४८/० | ३०.०२ |
| ७९ | ६४९+६५१ब | ११६.९६ |
| ८० | ६५९ | ६.७२ |
| | **एकूण** | **१८८६.९४ चौ.मी.** |

### अनुसूची- दोन

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण**

**अधिसूचना :- :- प्रकल्पाचे नाव** :- मौजे - पनवेल, ता. पनवेल येथील लोकमान्य बाळगंगाधर टिळकमार्ग (जय भारत नाका- अन्नपुर्णा ते स्वातंत्र्यवीर सावरकर चौक) १८८६.९४ चौ.मी.रस्ता रुंदीकरण प्रयोजनासाठी.

**निर्गमित :- प्रकल्प कार्याचे वर्णन** :- मौजे-पनवेल, ता.पनवेल येथील लोकमान्य बाळगंगाधर टिळकमार्ग (जय भारत नाका-अन्नपुर्णा ते स्वातंत्र्यवीर सावरकर चौक) न.भू.क्रं. ४५२ ते अ.भू.क्र.६५९ संयुक्त विवरणपत्रात नमूद केलेल्या मिळकतीप्रमाणे एकूण क्षेत्र १८८६.९४ चौ.मी. रस्ता रुंदीकरण बांधकाम जलद गतीने करणेसाठी आवश्यक आहे.

**करण्यापूर्वी :- समाजाला मिळणारे लाभ** :- पनवेल शहराचे औद्योगिक महत्व व नागरीकरण तसेच विकास आणि विस्तारवेगाने होत असल्याने प्रस्तावित करण्यांत आलेले क्षेत्र संपादन केलेखेरीज समाजाची उन्नती होऊ शकणार नाही. त्यामुळे सार्वजनिक रहदारीसाठी स्ता रुंदीकरण करणे आवश्यक आहे. *** येथे मजकूर भरावा (आर्थिक रोजगार, पायाभूत सूविधा, सोयीसुविधा व इतर लाभासंबंधात)

### अनुसूची- तीन

**बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे** :- निरंक

### अनुसूची- चार

**सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश :-** मौजे-पनवेल, ता.पनवेल लोकमान्य बाळगंगाधर टिळकमार्ग (जय भारत नाका- अन्नपुर्णा ते स्वातंत्र्यवीर सावरकर चौक) १८८६.९४ चौ.मी. रस्ता रुंदीकरण करणे आवश्यक आहे.सदर भूसंपादन प्रक्रिया लवकरात लवकर सुरू करावी.

**नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील** :- निरंक

टीप :- उक्त जमिनीच्या आराखडयाचे उपविभागीय अधिकारी, उप विभाग पनवेल यांचे कार्यालयामध्ये निरिक्षण करता येईल.

पनवेल,
दिनांक २४ डिसेंबर २०२४

**सही/-**
**पवन चांडक,**
**उप विभागीय अधिकारी पनवेल,**
**उप विभाग पनवेल.**

### आदिवासी रायगड प्रीमियर लीगला उत्स्फूर्त प्रतिसाद

# वरद इलेव्हन नाणिवली संघ विजेता

**मोहोपाडा : प्रतिनिधी**



रायगड जिल्ह्यातील आदिवासी युवकांना एकत्रित आणणे आणि त्यांच्या क्रीडा कौशल्याला वाव देण्याच्या उद्देशाने चौक येथे आदिवासी रायगड प्रीमियर लीग उत्साहात पार पडली. या स्पर्धेत वरद इलेव्हन नाणिवली संघ पहिल्या क्रमांकाचा मानकरी ठरला. त्यांना एक लाख रुपये व भव्य चषक देऊन गौरविण्यात आले.

चौक ग्रामपंचायतीचे सदस्य महादेव पिरकड यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या स्पर्धेत २५ संघांची नोंद झाली होती. द्वितीय क्रमांक श्लोक स्पोर्ट्स गरडा (५० हजार रुपये व चषक), तृतीय सागर यंगस्टार इलेव्हन चिंचखांबळे, चतुर्थ साहिल इलेव्हन आपटा आणि हर्ष दक्ष इलेव्हन चिंचवण संघाने पाचवा क्रमांक (प्रत्येकी २५ हजार) प्राप्त केला.

स्पर्धेवेळी भाजप जिल्हा उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे, माजी जि.प. सदस्य मोतीराम ठोंबरे, भाजप तालुका अध्यक्ष प्रवीण मोरे, विभाग प्रमुख पप्पू विचारे, उपाध्यक्ष शरद ठोंबरे, सचिव प्रकाश पवार, खजिनदार विष्णू खैर, सल्लागार शरद वाघे, सदस्य डी.एन. पवार, दामू कातकरी, बिरसा ब्रिगेड जिल्हाध्यक्ष जयवंत शिद, आदिवासी समन्वय समितीचे जिल्हाध्यक्ष, पत्रकार गणपत वारगडा, ग्रामपंचायत अधिकारी हरीश निरगुडा, पोलीसभाऊ आघान, मालडुंगे ग्रामपंचायत सदस्य उषा वारगडा, सामाजिक कार्यकर्त्या सीमा मेंगाळ, संतोष मेंगाळ आदी उपस्थित होते.

## आयांश इलेव्हन संघ एपीपीएलचा मानकरी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

कै. अण्णासाहेब पाटील प्रीमियर लीग २०२५ डे-नाईट क्रिकेट टूर्नामेंट नेरूळमधील एमजीएम मैदानात झाली. या स्पर्धेत आयांश इलेव्हन संघाने विजेतेपद पटकाविले, तर अभंग इलेव्हन संघ उपविजेता ठरला.

नवी मुंबई मनपातील स्थानिक माजी नगरसेविका सुनीता मांडवे यांनी सलग दोन दिवस या क्रिकेट स्पर्धेचे आयोजन केले होते. स्पर्धेत सहा संघांनी सहभाग घेतला. विजेत्या आयांश इलेव्हन संघास २० हजार रोख, चषक आणि सन्मानचिन्ह; तर उपविजेत्या अभंग इलेव्हन संघास १२ हजार रोख रक्कम, आकर्षक चषक आणि सन्मानचिन्ह माजी नगरसेवक रतन मांडवे, बेलापूर विधानसभा युवा अध्यक्ष निखिल मांडवे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आलर.

या क्रिकेट टूर्नामेंटमध्ये मालिकावीर गणेश कदम, उत्कृष्ट फलंदाज अजित धनावडे, उत्कृष्ट गोलंदाज अक्षय कांबळे, तर उत्कृष्ट क्षेत्ररक्षक शुभम पार्टे ठरला. त्यांनाही गौरविण्यात आले.



### राज्यस्तरीय खुली मार्शल आर्ट स्पर्धा

## शिवकालीन धातूची ढाल आणि चांदीचे कडे देऊन विजेत्यांचा सन्मान

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य मर्द मावळे संस्थेच्या वतीने दुसऱ्या राज्यस्तरीय खुली मार्शल आर्ट स्पर्धेचे आयोजन पनवेल येथे करण्यात आले होते. या स्पर्धेचे एक विशेष वैशिष्ट्य म्हणजे विजेत्या संघाला शिवकालीन पद्धतीची धातूची ढाल तसेच स्पर्धेतील दोन सर्वोत्तम खेळाडूंना चांदीचे कडे प्रदान करून गौरविण्यात आले.

संस्थापक अध्यक्ष आणि आयोजक भूपेंद्र गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली ही स्पर्धा झाली. स्पर्धेत पुरुष गटात तन्मय महाडिक (के.एस. वॉरियर्स अकॅडमी, पिंपरी चिंचवड, पुणे) आणि महिला गटात आश्लेषा पवार (व्हीजन मार्शल आर्ट्स अकॅडमी, सासवड) यांना चांदीचे कडे प्रदान करण्यात आले आणि त्यांना महाराष्ट्राचे मर्द मावळे व शूर मर्दानी या उपाधीने गौरविण्यात आले.

उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या संघांना शिवकालीन धातूची ढाल प्रदान करण्यात आली. यात प्रथम क्रमांक उपेंद्र मार्शल आर्ट्स अकॅडमी, द्वितीय डायनॅमिक स्पोर्ट्स अकॅडमी, तृतीय के.एस. वॉरियर्स अकॅडमी यांना सन्मानित करण्यात आले.

स्पर्धेचे उद्घाटन रिटायर्ड कर्नल वाय. पी. सिंग आणि बाल सामाजिक कार्यकर्त्या नीता सिंग यांच्या हस्ते करण्यात आले. सूत्रसंचालन अभिनंदन जाधव यांनी केले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापिका शीतल साळुंखे, सोमण मॅडम, प्रितम गायकवाड यांच्यासह महाराष्ट्राचे मर्द मावळे संघटनेचे पदाधिकारी व सदस्यांनी परिश्रम घेतले.

## सागरी जलतरण स्पर्धेत रायगडचे खेळाडू चमकले

**पाली : प्रतिनिधी**



महाराष्ट्र राज्य हौशी जलतरण संघटनेच्या वतीने आयोजित ६१वी सनरॉक ते गेट वे ऑफ इंडिया सागरी जलतरण स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत आपले कौशल्य दाखवत रायगडच्या खेळाडूंनी चमकदार कामगिरी केली व बक्षिसांची लयलूट केली.

स्पर्धेत रायगडच्या विशेषतः शिहू बेणसे विभागातील यशस्वी खेळाडूंमध्ये संदीप भोईर प्रथम क्रमांक ४० प्लस-दोन किमी, शार्दूल अमोल भोईर इयत्ता पाचवी प्लस ग्रुप वयोगट २ ते ११ वर्ष, त्रिशूल हितेश कुथे दोन किमी, क्रिश विजय कुथे वयोगट १२ ते १३ वर्ष दोन किमी, महेश तुकाराम कुथे वयोगट २६ ते ४५ पाच किमी मध्ये प्रथम क्रमांक, मयुष मनोज ठाकूर वयोगट १४ ते १५ पाच किमी, मनन जीवन घासे वयोगट १२ ते १३ वर्ष दोन किमी, पलक महेश पाटील, जान्हवी रूपेश पाटील, अंशु सुधाकर वारगे आदी खेळाडूंनी नेत्रदीपक कामगिरी करून विजेतेपद पटकावले. या खेळाडूंना जलतरण प्रशिक्षक सुनील पवार यांचे मार्गदर्शन लाभले.


स्पर्धेत सहा राज्यांमधून तसेच २६ जिल्ह्यांतून एकूण ४५३ जलतरणपटूंनी सहभाग घेतला. १ ते ५ किमी अंतराच्या विविध गटांमध्ये झालेल्या या स्पर्धेत स्टारफिश स्पोर्ट्स फाउंडेशनच्या जलतरणपटूंनी सहभाग घेतला होता. स्पर्धेच्या वेळी गेट वे ऑफ इंडिया येथे मान्यवरांकडून जलतरणपटूंचे अभिनंदन करण्यात आले. या वेळी महाराष्ट्र राज्य हौशी जलतरण संघटनेचे अध्यक्ष आनंद माने, सचिव राजू पालकर, पोलीस निरीक्षक राठोड, जलतरण प्रशिक्षक पवार आदी उपस्थित होते.

## 'आरसीबी'ची दिल्लीवर एकतर्फी मात

**वडोदरा : वृत्तसंस्था**

डब्ल्यूपीएलमध्ये रॉयल्स चॅलेंजर्स बंगळुरूने कर्णधार स्मृती मंधानाच्या वादळी अर्धशतकी खेळीच्या जोरावर दिल्ली कॅपिटल्सचा आठ गडी राखून पराभव केला. या हंगामातील आरसीबीचा हा सलग दुसरा विजय असून एकूण सलग पाचवा विजय मिळवत या संघाने मुंबई इंडियन्सच्या विक्रमाची बरोबरी केली आहे.

वडोदरा येथील कोटाम्बी स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या या सामन्यात दिल्ली संघाने प्रथम फलंदाजी करीत १४१ धावा केल्या होत्या. आरसीबीने २२ चेंडू शिल्लक असताना विजय साकारला. या सामन्यात आरसीबीची कर्णधार मंधानाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, जो योग्य ठरला. लक्ष्याचा पाठलाग करताना मंधाना आणि डॅनियल यांनी आरसीबीला चांगली सुरुवात करून दिली. मंधानाने ४७ चेंडूत ८१ धावांची खेळी साकारली. डॅनिएलने ४२ धावा केल्या. एलिस पेरी (७) आणि रिचा घोष (११) यांनी नाबाद राहत आरसीबी १६.२ षटकात विजय मिळवून दिला.










दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, मुख्य संपादक : देवदास मटाले. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com